# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२०

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### जात प्रमाणपत्र पडताळणीचे उपायुक्त व दक्षता पथक प्रमुख यांनी केलेल्या गैरप्रकारांबाबत

**(१) २९९८ (१५-०७-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली विभागीय जात पडताळणीचे उपायुक्त श्रीमती छाया कुलाल व लातुर विभागीय जात पडताळणी दक्षता पथकाचे प्रमुख श्री एस.एस. कैंद्रे यांनी जात प्रमाणपत्र वाटपात केलेले गैरप्रकार व अवैध ठरवलेले प्रस्ताव यासाठी प्रचंड आर्थिक लुट केल्यावरून त्यांच्या काळातील देण्यात आलेली सर्व प्रमाणपत्र तसेच अवैध ठरवलेले प्रस्ताव यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, सामाजिक न्याय यांच्याकडे लेखी तक्रार नोंदविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीमती कुलाल व श्री.कैंद्रे यांच्या काळात देण्यात आलेली सर्व प्रमाणपत्र तसेच फेटाळण्यात आलेले व अवैध ठरवलेले प्रस्ताव या सर्वांची वरिष्ठस्तरावरून चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोंषीविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०२-०९-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासनाने महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ मधील पोटनियम २५(४) नुसार चौकशी करण्यासाठी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) या प्रकरणी आयुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे यांच्याकडून शासनास अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## टेंभुर्णी (ता.माढा, जि.सोलापूर) येथे क्वारंटाईन केलेल्या नागरिकांकरीता असलेल्या खाद्यपदार्थांचा अपहार झाल्याबाबत

**(२) ३०५४ (२९-०५-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री. गोपिचंद पडळकर, श्री. विजय उर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंभुर्णी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील जय तुळजाभवानी आश्रमशाळेत शासनामार्फत शेल्टर होममध्ये क्वारंटाईन केलेल्या नागरिकांची जेवणाची व्यवस्था टेंभुर्णी गावातील सामाजिक संघटना व कार्यकर्ते यांच्याकडून करण्यात आली आहे, याठिकाणी नेमलेल्या संबंधित मंडळ अधिकारी व त्यांच्या सहकाऱ्यांनी खाद्यपदार्थ क्वारंटाईन केलेल्या नागरिकांना वाटण्याऐवजी स्वतःच्या गाडीतून घेऊन जात असल्याचा प्रकार सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यामध्ये चित्रिकरण झाल्याचे माहे मे, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाद्यपदार्थांचा अपहार कारणाऱ्या दोषी मंडळ अधिकारी व त्यांचे सहकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२०-०८-२०२०) :** (१) व (२) अखिल महाराष्ट्र वडार संघटना व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, सोलापूर यांनी दिनांक १४/०४/२०२० व दिनांक १५/५/०२०२० च्या पत्राव्दारे सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यामधील चित्रीकरणाच्या आधारे टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर येथील जय तुळजा भवानी आश्रमशाळेतील क्वारंटाईन केलेल्या लोकांसाठी टेंभुर्णी गावातील सामाजिक संघटना व कार्यकर्ते यांच्याकडून प्राप्त झालेले खाद्यपदार्थ व फळे, मंडळ अधिकारी, स्वत:च्या गाडीमधून घेवून जात असल्याची तक्रार केलेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, माढा यांनी केलेल्या चौकशीमध्ये संबंधित मंडळ अधिकारी हे टेंभुर्णी, ता.माढा, जि.सोलापूर येथील जय तुळजा भवानी आश्रमशाळेतील क्वारंटाईन केलेल्या लोकांसाठी टेंभुर्णी गावातील सामाजिक संघटना व कार्यकर्ते यांच्याकडून प्राप्त झालेले खाद्यपदार्थ व फळे यांचे वाटप आश्रमशाळेत क्वारंटाईन केलेल्या लोकांना केल्यानंतर, शिल्लक राहिलेले खाद्यपदार्थ व फळे ही खराब होवू नयेत या हेतूने त्यांचे वाटप गावातील इतर ठिकाणी असलेल्या गरीब मजुर व वृध्दाश्रमातील वृध्द व्यक्ती यांना करण्याकरीता घेवून गेल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी मंडळ अधिकारी व त्यांचे सहकाऱ्यांनी कोणताही अपहार केला नसल्याने त्यांचेवर कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विश्वभारती फुड्स प्रायव्हेट लिमिटेड या अपात्र पुरवठादारांकडून आश्रमशाळांना सुगंधी दुधाचा पुरवठा केल्याबाबत

**(३) ३११३ (३०-०६-२०२०). श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, गोपिचंद पडळकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ५२८ आदिवासी आश्रमशाळांमध्ये दोन लाखाहून अधिक मुले शिक्षण घेत असून त्यांना पोषण आहारांतर्गत दररोज २०० मिली सुगंधी दुध देण्याचा निर्णय सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आदिवासी विभागाने घेतल्यानंतर त्या पार्श्वभूमीवर सुगंधी दुधाच्या खरेदीसाठी दिनांक ५ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास ऑनलाईन निविदा काढण्यात आल्या असून त्यात पुरवठादार डेअरी किंवा संस्थेच्या स्वतःचा टेट्रापॅकिंग प्रकल्प असावा अशी अट होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ऑनलाईन निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पराग डेअरीला १८००० लिटर दुध, महानंदला ५०००, वारणा डेअरीला ४००० तर विश्वभारती फूड्सला ९००० लिटर दूध पुरवण्याचा ठेका मिळाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निविदा प्रक्रियेतील नियमांचे उल्लंघन झालेले असतानाही विश्वभारती फूड्सला सुगंधी दुध पुरवठा देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने अपात्र पुरवठादाराविरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२१-०८-२०२०) :** (१) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दोनशे मिली टेट्रापॅक (सुगंधी दुध) पुरविण्याची निविदा नोव्हेंबर, २०१८ मध्ये प्रसिध्द केली हे खरे आहे.

(२) प्रश्नात नमुद केल्याप्रमाणे प्रतिदिन अंदाजित दुध पुरवठ्याचा ठेका मिळाला आहे, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) विश्वभारती फूड्सने पुरवठा चालु केल्यानंतर लोकप्रतिनिधींकडून त्यांच्याबाबत तक्रारी येऊ लागल्या. सदर तक्रारीबाबत आयुक्तालयाकडून चौकशी केली असता, मे.विश्वभारती फूड्सने निविदेतील अटींचा भंग केल्याचे चौकशीअंती सिध्द झाल्याने त्यांचा शासकीय आश्रमशाळांना दुध पुरवठ्याचा आदेश व करारनामा आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे आदेश दिनांक १८/०५/२०२० अन्वये रद्द करण्यात आलेला आहे.

---

## रायगड मधील कर्नाळा नागरी सहकारी बँकेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४) ३२४२ (२९-०५-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड मधील कर्नाळा नागरी सहकारी बँकेत झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी चौदा संचालकांसह ७६ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारामुळे हजारो ठेवीदारांच्या ठेवी बँकेत अडकून पडलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने बँकेत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन ठेवीदारांच्या ठेवी त्यांना परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (१८-०८-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

सदर प्रकरणी मा.सहकार आयुक्त, पुणे यांनी कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या कर्ज व्यवहाराचे जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग-१ अलिबाग यांचेमार्फत विशेष लेखा परिक्षण केले. त्यामध्ये गैरव्यवहार, गैरविनियोग, विनातारण कर्ज वाटप यामुळे बँकेचे सभासद, ठेवीदार व खातेधारक यांच्या ठेवी धोक्यात आल्याने दोषींविरुध्द पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र.७८/२०२० भादंवि कलम ४०९, ४१७, ४२०, ४६३, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), ३४ सह सहकारी संस्था अधिनियम कलम १४७ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम कलम ३ प्रमाणे ७६ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील समाजकल्याण विभागात पूर्णवेळ अधिकारी आणि कर्मचारी मिळणेबाबत

**(५) ३३५३ (१५-०७-२०२०). श्री.कपिल पाटील** : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विशेष शाळेतील अंध, कर्णबधीर, अपंग शाळेतील शिक्षकांच्या समाजकल्याण विभागात एक अधिकारी मुंबई शहर, मुंबई उपनगर व जात पडताळणी असे तीन विभागाचे काम पहात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागाला पूर्णवेळ अधिकारी आणि कर्मचारी नसल्यामुळे शिक्षक/शिक्षकेतर सेवानिवृत्त होऊनही दोन-दोन वर्षे झाली तरी त्यांना निवृत्तीवेतन, ग्रॅच्युएटी मिळत नाही, तसेच सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन व इतर फायदयांसाठी त्यांना वारंवार समाजकल्याण विभागाकडे विचारणा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर विभागाला पूर्णवेळ अधिकारी आणि कर्मचारी मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२८-०७-२०२०) :** (१) समाजकल्याण अधिकारी बृहन्मुंबई यांच्याकडे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई शहर व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई उपनगर या पदांचा अतिरिक्त कार्यभार असून, मुंबई शहर व मुंबई उपनगर येथील जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांच्या संशोधन अधिकारी पदांवर स्वतंत्र अधिकारी कार्यरत आहेत.

(२) मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्हयांमध्ये दिव्यांगांकरीता अनुक्रमे २६ व २७ अनुदानित शाळा/कर्मशाळा आहेत. मुंबई शहर येथील ५६ सेवानिवृत्तीचे प्रस्ताव प्रलंबित होते. पैकी ४२ प्रस्ताव मंजूर झाले असून, ५ प्रस्ताव अधिदान व लेखा अधिकारी व ५ प्रस्ताव महालेखाकार कार्यालयास सादर केलेले आहेत. मुंबई उपनगर येथे मार्च, २०२० ते मे, २०२० या कालावधीत ८ प्रस्ताव प्राप्त झाले असून, त्यानुषंगाने सदर कार्यालयामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रस्तुत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण संवर्गातील रिक्त पदे पदोन्नती तसेच सरळसेवेने भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळांना कला व क्रीडा शिक्षक पद पूर्णवेळ भरणेबाबत

**(६) ३४७८ (१७-०७-२०२०). डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील:** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळांना कला व क्रीडा शिक्षक हे पूर्णवेळ पद नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कला व क्रीडा शिक्षकांचे पद पूर्णवेळ नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुंणाना वाव मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कला व क्रीडा शिक्षकांचे पदनिर्मितीचे धोरण आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी आश्रमशाळांना कला व क्रीडा शिक्षक हे पूर्णवेळ पद भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०७-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यातील प्रत्येक शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या कला व क्रीडा गुणांना वाव मिळण्याकरीता आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय, दिनांक १३/०६/२०१९ नुसार शासकीय आश्रमशाळेसाठी कला (कार्यानुभव) शिक्षक कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय, दिनांक ०६/०३/२०१८ नुसार कंत्राटी पध्दतीने क्रीडा शिक्षक/क्रीडा मार्गदर्शकाची (Coach) नियुक्ती करणेसाठी मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या रुचिनुसार, प्राविण्यानुसार व त्यांच्यातील कलागुणांचा विकास करण्यासाठी वरील शिक्षकांची/मार्गदर्शकांची नेमणूक केली जाते. त्यामुळे सदरची शिक्षकांची/ मार्गदर्शकांची पदे कायस्वरुपी भरण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) शासकीय आश्रमशाळांमध्ये २१७ कला (कार्यानुभव) शिक्षक व ३३१ क्रीडा शिक्षक/क्रीडा मार्गदर्शकाची (Coach) भरण्यात आले असून उर्वरीत शाळांमध्ये भरतीची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुटूंबातील एका व्यक्तीला जात प्रमाणपत्र मिळाल्यानंतर रक्ताच्या नात्यातील व्यक्तींना जात प्रमाणपत्र देण्याबाबत

**(७) ३४८५ (१५-०७-२०२०). डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील,श्री. दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुटूंबातील एका व्यक्तीला जात प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्या आधारे त्याच कुटूंबातील त्याच्या रक्ताच्या नात्यातील व्यक्तींना जात प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आदेश निर्गमित केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०२-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ च्या अधिसूचनेनुसार रक्त नात्यातील व्यक्तीचे जात प्रमाणपत्राची खातरजमा करुन संबंधीताचे नातेसंबंध सिध्द होत असलेले पुरावे विचारात घेवून कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

# शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकांच्या सराव परिक्षेच्या निमित्ताने वेतनवाढी रोखल्याबाबत

**(८) ३५४२ (१५-०७-२०२०). डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा प्रकल्पातील शासकीय आश्रमशाळेतील ४८ शिक्षकांच्या तीन सराव परीक्षा आयोजित करुन केवळ एकाच सराव परिक्षेच्या निकालावर सर्व माध्यमिक शिक्षकांच्या वेतनवाढी रोखण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांनी अपर आयुक्त, अमरावती यांच्याकडे अपील करुन सहा महिन्यांचा कालावधी होऊनही सुनावणी झाली नसून पुर्वीच्या प्रकल्प अधिकाऱ्यांनी शिक्षकांबद्दल सकारात्मक अहवाल पाठवून सुध्दा पुनश्च: शिक्षकांच्या मागील ५ वर्षाचे निकाल मागविणे आणि त्यांच्या परीक्षा घेणे यामध्ये वेळ वाया घालवणे सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अपर आयुक्त स्तरावर ४८ शिक्षकांना वैयक्तिक सुनावणी देऊन अपिले निकाली काढण्याची सुरु करण्यात येत आलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त ४८ शिक्षकांना वैयक्तिक सुनावणी देऊन अपिले निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२७-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी ४८ शिक्षकांना वैयक्तिक सुनावणी देऊन अपिले निकाली काढण्याची कार्यवाही अपर आयुक्त स्तरावर करण्यात येत आहे. तथापि, सध्याच्या कोरोना महामारीच्या अनुषंगाने लॉकडाऊन व जिल्हाबंदी असल्याने सदर कार्यवाही पूर्ण होण्यास काही कालावधी लागणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत

**(९) ३५७३ (०२-०६-२०२०). डॉ.रणजित पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.प्रशांत परिचारक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतपिकांचे नुकसान झाले असून राज्यातील दोन लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी पीक विमा काढलेले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याचे पैसे मिळत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंगळवेढा (जि.सोलापूर) तालूक्यामध्ये माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये तालूक्यातील ७ महसूल मंडळातील दोन हजारापेक्षा जास्त डाळींब उत्पादक शेतकऱ्यांनी पीक विमा भरुनही पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, तसेच पंढरपूर (जि.सोलापूर) तालूक्यातील खरीप हंगाम २०१९ मध्ये एकूण ९ महसूल मंडळापैकी सात महसूल मंडळातील शेतकरी शासनाच्या जाचक निकषामुळे पीक विम्याच्या मदतीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये भाग घेतलेल्या बाधित शेतकऱ्यांच्या क्षेत्राचे पंचनामे करुन अहवाल भारतीय कृषी विमा कंपनी व बजाज अलियान्झ कंपनीस पाठविण्यात आला असून विमा कंपनीकडून नुकसान भरपाईची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, तसेच किती शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्यात आली वा किती शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याचे प्रलंबित आहे,

(४) असल्यास, पीक विम्याच्या मदतीपासून वंचित राहिल्यामुळे विविध संघटनांसह राजकीय पक्ष व शेतकरी यांनी तालुका कृषी अधिकारी, पंढरपूर यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, तसेच प्रशासनाच्या जाचक अटी व शर्तीमुळे शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला असून शेतकऱ्यांनी आंदोलन करण्याचा इशारा शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पीक विम्याची मदत देण्यास विलंब करणाऱ्या विमा कंपनी व दोषी अधिकारी यांचेवर कारवाई करुन शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२६-०८-२०२०) :** (१) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०१९ मध्ये राज्यातील १२६.२७ लाख शेतकरी अर्जदारांनी रक्कम रुपये ५७६.३८ कोटी विमा हप्ता भरून ६५.९९ लाख हेक्टर क्षेत्र विमा सांक्षित केले आहे. सहभागी शेतकऱ्यांपैकी ८१.१३ लाख शेतकऱ्यांना रक्कम रुपये ५४१५.३९ कोटी नुकसान भरपाई विमा कंपन्यामार्फत निश्चित करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे

(२) हे खरे नाही.

(३) मृग बहार सन २०१९ मध्ये मंगळवेढा तालुक्यातील विमा योजनेत एकूण सहभागी डाळींब उत्पादक शेतकऱ्यांपैकी ६४०८ शेतकऱ्यांना रक्कम रुपये १४४९.०५ लाख नुकसान भरपाई विमा कंपन्यामार्फत निश्चित करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे.

तसेच मृग बहार सन २०१९ मध्ये पंढरपूर तालुक्यातील विमा योजनेत एकूण सहभागी डाळींब उत्पादक शेतकऱ्यांपैकी ११२० शेतकऱ्यांना रक्कम रुपये २९९.४४ लाख नुकसान भरपाई विमा कंपन्यामार्फत निश्चित करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) पात्र शेतकऱ्यांना नुकससान भरपाई अदा केली आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) तहसिल कार्यालयातून टाळेबंदी काळात अनावश्यक पास वितरीत केल्याबाबत

**(१०) ३५७७ (२९-०५-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) तहसिल कार्यालयात टाळेबंदी काळात कोणतेही रेकॉर्ड न तपासता जवळपास ५२५ पास वितरीत करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर येथे सापडलेले आठ कोरोनाग्रस्त उस्मानाबाद येथील धाब्यावर थांबले असताना त्यांच्या वाहनांची तपासणी करण्यात आल्यावर उस्मानाबाद तहसिलदारांनी त्यांचे वाहन परवाने स्वतःच्या सहीने प्रमाणित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अत्यावश्यक सेवेचे पास उस्मानाबाद तहसिल कार्यालयातमार्फत मनमानी पध्दतीने गरज नसताना कोणतेही रेकॉर्ड न ठेवता सर्रासपणे पास वाटप करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेजबाबदारपणे पास वितरीत करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०२-०९-२०२०) :** (१) टाळेबंदीच्या काळात अत्यावश्यक सेवा व निकड विचारात घेऊन तहसिल कार्यालय, उस्मानाबाद यांच्याकडून अर्जदारांचे अर्ज, नोंदणी प्रमाणपत्रे व ओळखीबाबतचे पुरावे अशा कागदपत्रांची पडताळणी करुन दिनांक ०३/०४/२०२० रोजीपर्यंत अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या विशेष आस्थापना यांना एकूण ६४७ परवाने वितरित करण्यात आले होते.
(२) हरियाणामधून आंध्रप्रदेश येथे जाणारी दोन वाहने पोलीस विभागाकडून अडविण्यात आली होती. सदर दोन वाहनांच्या परवान्याची पडताळणी करण्याची विनंती पोलीस विभागाकडून महसूल यंत्रणेस करण्यात आली. त्यानुषंगाने तहसिलदार उस्मानाबाद यांनी दूरध्वनीव्दारे पडताळणी केली असता, सदर परवाने हरियाणा राज्यातील उपविभागीय दंडाधिकारी, फिरोजपूर झिरका या कार्यालयातून वितरीत झाल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार परवाना पडताळणी केल्याबाबतची स्वाक्षरी करुन सदर परवाने तहसिलदार उस्मानाबाद यांनी पोलीस विभागास परत केले.
(३) तहसिल कार्यालय, उस्मानाबाद यांच्याकडून अत्यावश्यक सेवांचे परवाने देताना नोंद वहीमध्ये नोंदी करण्यात आल्या आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेतीमाल व कापूस कमी भावाने विकल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाल्याबाबत

**(११) ३७४६ (१५-०७-२०२०). श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक** : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीसीआय आणि पणन महासंघाकडून कापसाची तर नाफेडकडून इतर शेतपिकांची अत्यंत संथगतीने होणारी खरेदी आणि त्यात समाविष्ट असलेल्या अटींमुळे व्यापाऱ्याकडे तूर, मका, हरभरा इत्यादी अत्यल्प भावाने विकण्याची तसेच कापूस क्विंटलमागे हजार रुपये कमी भावाने विकण्याची पाळी शेतकऱ्यांवर आली असून, एकीकडे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत असून दुसरीकडे सुमारे सव्वादोन हजार कोटीचा कापूस शेतकऱ्यांच्या घरातच पडून राहिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कापसाची आधारभूत किंमत ५३००/५४०० रुपये क्विंटल, मक्क्याची आधारभूत किंमत १७५५, तुरीची आधारभूत किंमत ५८०० रुपये असताना सीसीआय आणि फेडरेशनच्या माध्यमातून अत्यंत धीम्यागतीने व केवळ ठराविक गाड्यांचा कापूस खरेदी करण्याचे निश्चित केल्यामुळे माहे मे, २०२० च्या पहिल्या आठवड्यापासून शासनाने सुरु केलेल्या खरेदी केंद्रातून कापूस व शेतमाल खरेदी केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या या नाकर्ते धोरणामुळे सीसीआय व नाफेडकडून परत पाठविलेल्या शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांकडे सदरहू शेतीमाल व कापूस कमी भावाने विकावा लागल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खरीप हंगाम जवळ असल्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती पैसा असणे अगत्याचे असल्याने शासनाने शेतकऱ्यांचा विनाविलंब कापूस, तूर, मका, हरभरा आदी शेतीमाल सर्वच्या सर्व खरेदी करण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२७-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

राज्यात कापूस, तुर, हरभरा व मका याची हमीभावाने खरेदी खालीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

(खरेदी लाख क्विंटलमध्ये)

| अ.क्र. | शेतमालाचे नाव | खरेदी सुरु केल्याचा दिनांक | कोविड पूर्वीची खरेदी | कोविड नंतरची खरेदी | एकूण खरेदी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | कापूस CCI<br>पणन महासंघ<br>एकूण | नोव्हेबर,२०१९ | ९१.९०<br>५४.०३<br>१४५.९३ | ३५.७०<br>३६.७५<br>७२.४५ | १२७.६०<br>९०.७८<br>२१८.३८ |
| (२) | तुर | फेब्रुवारी,२०२० | ७.०१ | १३.४० (दिनांक १५.०६.२० पर्यंत) | २०.४१ |
| (३) | हरभरा | मार्च, २०२० | ०.०२ | ३८.५६ (दिनांक १५/०७/२०पर्यंत) | ३८.५८ |
| (४) | मका (अ.ना.पु.व.ग्रा.सं. विभागामार्फत) | मे, २०२० | - | ७.३९ | ७.३९ |

(२) हे खरे नाही. कोविड-१९ च्या कारणास्तव लागू केलेल्या टाळेबंदीमुळे मध्यंतरी बंद झालेली कापूस खरेदी दिनांक १५ एप्रिल, २०२० पासून दिलेल्या शिथिलतेनंतर सीसीआय व कापूस पणन महासंघाव्दारे पूर्ववत चालू झालेली आहे. तसेच किमान हमी दराने कापूस खरेदी दिनांक ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत सुरु ठेवण्याचे सीसीआयने घोषित केलेले आहे. सीसीआय व कापूस पणन महासंघाने कोविडनंतर खरेदी केंद्र व जिनिंग फॅक्ट्रींची संख्या देखील वाढविलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

कापूस, तुर, हरभरा व मका यांची राज्यातील हमीभावाने एकूण खरेदी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शेतमालाचे नाव | एकूण खरेदी (लाख क्विंटल मध्ये) | खरेदीचे मूल्य (कोटीत) | अदा केलेली रक्कम (कोटीत) | शिल्लक रक्कम (कोटीत) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | कापूस | - | - | - | - |
| | CCI | १२७.६० | ६९२९.७९ | ६७९४.५९ | १३५.२० |
| | पणन महासंघ | ९.७८ | ४८४७.१० | ४२३४.८८ | ६१२.२२ |
| | एकूण | २१८.३८ | ११७६७.८९ | ११०२९.४७ | ७४७.४२ |
| (२) | तुर | २०.४१ | ११८६.१९ | १००२.४४ | १८३.६५ |
| (३) | हरभरा | ३८.५८ | १८८१.०८ | ९९१.१८ | ८८९.९० |
| (४) | मका | ७.३९ | १३०.१३ | ५२.३५ | ७७.७८ |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांसाठी शासकीय सेवेत आरक्षण लागू करण्याबाबत

**(१२) ३८५५ (१५-०७-२०२०). श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे नापिकी व कर्जबाजारी झालेले अल्प भूधारक शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याने नैराश्येपोटी आत्महत्या करण्याच्या घटना वाढत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबावर पाल्यांचे शिक्षण व लग्नाचे समारंभ करण्याबाबत आर्थिक संकट ओढवल्याने त्यांना हालअपेष्टांमध्ये जीवन जगावे लागत असून अनेक पाल्यांचे शिक्षण बंद होत आहे याबाबत शासनाने अशा कुटुंबांचा सर्व्हे करून त्यांना योग्य ती आवश्यक मदत केली आहे काय,

(३) असल्यास, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील शेतकऱ्यांच्या पाल्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार शासकीय सेवेत ३ टक्के आरक्षण लागू करण्याची मागणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक २७ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन देवून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२७-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) नापिकी, राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न करू शकल्याने होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांसाठी केलेल्या शेतकरी आत्महत्या प्रकरणी शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २००६ नुसार रुपये १.०० लक्ष इतकी मदत देण्यात येते.
(३) विभागास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.प्रानिमं-१२१७/प्र.क्र.९२/१७/१३-अ, दिनांक २ डिसेंबर, २०१७ अन्वये भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील गट-ब (अराजपत्रित) व गट-क ची पदे भरताना लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांना समान गुण मिळाल्यास व त्यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य असल्यास त्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील, असा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हौसिंग सोसायट्यांमध्ये पाहुणे व मोलकरणी यांना मज्जाव केल्याबाबत

**(१३) ३८६१ (१७-०७-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने लॉकडाउन शिथिल करून अनेक निर्बंध हटवले असतानाही मुंबई आणि मुंबई लगतच्या भागातील अनेक हौसिंग सोसायट्यांमधील कमिट्यांनी इमारतीमध्ये येणारे पाहुणे व कामाला येणाऱ्या मोलकरणी व इतरांना मज्जाव करीत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही सोसायट्यांकडून प्रवेश देण्यासाठी कोरोनामुक्त असल्याचे प्रमाणपत्र मागण्याची अट घातली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उक्त सोसायट्यांबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२७-०७-२०२०) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मुंबई शहर, मुंबई उपनगर तसेच वसई, जि.पालघर या भागातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीमध्ये घरकाम करणाऱ्या मोलकरणी, वाहन चालक, दुध पुरवठा व वृत्तपत्र वितरण करणाऱ्या व्यक्तींना प्रवेश देण्याकरीता संस्था अटी घालत असल्याच्या तक्रारी संबंधित निबंधकांकडे प्राप्त झाल्या आहेत.
(३) शासनाच्या दिनांक २६/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये तसेच, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाच्या दिनांक २९/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये घर कामगार व वाहन चालक यांना गृहनिर्माण संस्थांमध्ये कामकाजासाठी प्रवेश देण्यासंदर्भात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, तसेच या सूचनांच्या विपरीत गृहनिर्माण संस्थांनी नियम तयार करु नयेत, ही बाब राज्यातील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निदर्शनास आणून देणेबाबत सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना निर्देश दिले आहेत. त्यानुसार सर्व संबंधित निबंधकांनी उक्त निर्देशाचे पालन करणेबाबत गृहनिर्माण संस्थांना सुचित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तलाठी कार्यालय बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) ३८७१ (१५-०७-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भरणे, खोपी, बहिरवली, निगडे, शिवतर, भोस्त, खवटी व मुरडे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे तलाठी कार्यालय बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी उपलब्धतेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२६-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४/२/२०२० रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे जि.रत्नागिरी, ता.खेड येथे तलाठी कार्यालयांकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे.
(२) व (३) ता.खेड, जि.रत्नागिरी येथील तलाठी कार्यालयाच्या इमारत बांधकामाचे अद्यावत दरसूचीवर आधारित अंदाजपत्रके व नकाशे अप्राप्त आहे. सदर अंदाजपत्रक शासनास प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

## रायगड जिल्ह्यातील प्रकल्पांच्या दुरूस्तीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत

**(१५) ३९१८ (१७-०७-२०२०). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाच्या धरणातून पाटबंधारे योजनांसह इतर प्रकल्प योजनांच्या माध्यमांतून तीन हजार हेक्टरपेक्षा जास्त जमीन सिंचनाखाली येत असून जिल्ह्यातील उद्योग समूहांना तसेच गावांना पिण्याचे पाणी पुरविले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित येत असलेल्या सर्व धरणांतून शासनाला प्रतिवर्षी रुपये ११० कोटींचा महसूल मिळत असून गेल्या १० वर्षापासून या प्रकल्पांच्या दुरूस्तीकरीता कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पांच्या दुरूस्तीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२८-०७-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

रायगड जिल्ह्यातील प्रकल्पातून शासनाला दरवर्षी रुपये ११० कोटी महसूल प्राप्त होत आहे.

शासन निर्णय, दिनांक १७/११/२०१६ पूर्वी शासनस्तरावरून प्रकल्पांच्या दुरुस्तीकरीता आवश्यकतेप्रमाणे निधी प्राप्त झालेला आहे व तद्नंतर महामंडळास प्राप्त होणाऱ्या सिंचन पाणीपट्टीतून प्रकल्पांच्या नियमित देखभाल व दुरुस्तीकरीता निधी प्राप्त होतो. सन २००९-२०१० पासून सन २०१८-२०१९ पर्यंत दरवर्षी सरासरी १२.९५ कोटी खर्च झाले आहेत. सन २०१९-२०२० साठी रुपये ३.१६ कोटी निधी देखभाल व दुरुस्तीची कामासाठी खर्च करण्यात आलेले आहे. तसेच सन २०२०-२०२१ साठी रुपये ३१.२२ कोटी देखभाल व दुरूस्तीची कामे करण्याचे नियोजित आहे. यामध्ये काळ मोठा प्रकल्प, राजनाला सिंचन समूह व जिल्ह्यातील इतर राज्यस्तरीय लघु प्रकल्पांचे देखभाल व दुरुस्ती कामांचा समावेश आहे.
(३) चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

दुरुस्तीसाठी आवश्यक निधी महामंडळाकडून प्राप्त होत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संचमान्यतेचे शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(१६) ३९५१ (१७-०७-२०२०). श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एमईपीएस कायदयाने निश्चित केलेले संच मान्यतेचे निकष दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ व दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयाने बदलून शिक्षक संख्या कमी केल्याने विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणित व विज्ञान या विषयाच्या दोन शिक्षकांऐवजी एकच शिक्षक देणे, भाषा विषयाचे शिक्षक रद्द करणे, कला क्रीडा व संगीत शिक्षकांना वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णय रद्द करण्याबाबत शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे, सुभाष मोरे, संजय वेतुरेकर, जालिंदर सरोदे आणि प्रकाश शेळके यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संचमान्यतेचे शासन निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती वर्षा गायकवाड (०७-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) संचमान्यतेचा शासन निर्णय सुधारित करण्याची कार्यवाही सुरु आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## निसर्ग चक्रीवादळामुळे कोकणातील किनारपट्टी भागाचे नुकसान झाल्याबाबत

**(१७) ३९६२ (१७-०७-२०२०). श्री.जयंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कपिल पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग तसेच ठाणे व पालघर या जिल्हयातील अनेक गावांना दिनांक ३ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास ताशी ११० ते १२० कि.मी इतक्या प्रचंड वेगाने आलेल्या 'निसर्ग' चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणावर तडाखा बसल्याने विशेष करून किनारपट्टी

भागातील अनेक घरादाराची तसेच खाजगी मालमत्तेची मोठ्या प्रमाणावर झालेली पडझड, उदरनिर्वाहाचे साधन असलेले नारळ, सुपारी, पोफळी, आंबा, फणस, काजू, केळी, कोकम, चिंच तसेच मसाल्याच्या पदार्थांची झाडे मुळासकट भुईसपाट झाल्याने तसेच अनेक ठिकाणी रस्ते वाहून गेल्याने मनुष्यहानी, पशुधनाची हानी तसेच मच्छीमारांच्या बोटींचे व मच्छीमार साधन सामुग्रीचेही प्रचंड नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास मच्छीमारांच्या बोटींचे व अन्य मच्छीमारीच्या साधन सामग्रीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झालेले असताना, त्यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारे आर्थिक मदत व नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे मच्छीमारांकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याची भावना निर्माण झाली असून मच्छीमारांच्या बोटींचे, मच्छीमारीच्या साधन सामुग्रीचे विनाविलंब पंचनामे करुन त्यांना तात्काळ आर्थिक मदत व नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधी तसेच महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीने मा.मुख्यमंत्री व मा.मत्स्यव्यवसाय मंत्री यांच्याकडे दिनांक १७ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, नाशिक, नंदुरबार, जळगाव आणि उर्वरित जिल्हयातील बाधितांची पाहणी करुन तात्काळ मदत देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी करुन ही मदत देण्यास विलंब होत असल्याने या भागातील नागरीकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे जून, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली असून बाधित झालेल्या शेतकरी आणि स्थानिक नागरीकांना NDRF च्या निकषापेक्षा जास्त मदत देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, निसर्ग चक्रीवादळाचा फटका कोकणासह उत्तर महाराष्ट्र व पश्चिम महाराष्ट्राला देखील बसल्याने मोठ्या प्रमाणात शेतीपिकांचे, फळबागांचे, घरांचे नुकसान झाले असून पुणे जिल्हयात निसर्ग पॉलिहाऊस व शेडनेटचे २०६ हेक्टरवरील सुमारे ७५१ शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यातील नागाव, चौल, रेवदंडा गावातील तसेच श्रीवर्धन, मुरुड, पेण येथील सुमारे ५ लाखांहून अधिक घरे ५०३३ हेक्टर पेक्षा जास्त शेत जमिनी व बागायतीसह घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान

झाले असून अनेक जनावरे मृत्यूमुखी पडली असून जिल्हा परिषद शाळांचे, महाविद्यालयांचे तसेच महावितरणाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तर रायगड जिल्ह्यातील अलिबाग, श्रीवर्धन तालुक्यातील प्रत्येकी १ व माणगाव तालुक्यातील २ अशा एकूण ४ जणांचा मृत्यू व सुमारे १६ नागरिक जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोकणात निसर्ग चक्रीवादळामुळे एकूण नुकसान ३४०० कोटींच्या घरात असून या वादळाचा सर्वात मोठा फटका रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली व मंडणगड या दोन तालुक्यांना बसला असून नुकसान झालेल्या २७ हजार ७८२ घरांमध्ये ९३ टक्के घरे ही दापोली व मंडणगड तालुक्यातील असून, चक्रीवादळामुळे कोकणाचे झालेले नुकसान पाहता शासनाने यासाठी जाहीर केलेली मदत ही तुटपुंजी असल्याने शासनाने अधिकची मदत देण्यासाठी तातडीने नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२८-०७-२०२०) :** (१) व (२) होय.

(३) निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या सागरी किनारपट्टीतील जिल्ह्यांमध्ये शेती व मालमत्ता यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरापेक्षा विशेष बाब म्हणून वाढीव दराने मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून आतापर्यंत रुपये ४९०.१३ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) निसर्ग चक्रिवादळामुळे पुणे जिल्ह्यात २०३.५४ हेक्टर वरील पॉली हाऊस शेडनेटचे नुकसान झाले आहे. रायगड जिल्ह्यातील १६०६० हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिकांचे नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. रायगड जिल्ह्यातील सुमारे १.८३ लक्ष घरांचे पूर्णत:/अंशत: नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यात ७ व्यक्तींचा मृत्यू तसेच २६८ जनावरांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(५) रत्नागिरी जिल्ह्यातील ४३,१०९ घरांचे पूर्णत:/अंशत: नुकसान झाले असल्याचे दिसून आले आहे. निसर्ग चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीसाठी राज्य शासनाने वाढीव दराने मदत देण्यासाठी अद्यापपर्यंत शासनाने रुपये ४९०.१३ कोटी इतका निधी मदत वाटपासाठी वितरीत केला आहे.

---

## रायगड जिल्हयातील शेतकऱ्यांचे भात पिकाचे नुकसान झाल्याबाबत

**(१८) ३९६३ (१५-०७-२०२०). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण व अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील खारेपाट विभागासह रायगड जिल्हयातील शेतात तयार झालेली भात शेतीची रोपे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान उन्हाच्या तडाख्यामुळे करपून गेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी पुन्हा तीन ते चार वेळा नवीन बियाणे शेतामध्ये टाकून तयार झालेल्या भात पिकांची रोपे पाऊस न पडल्यामुळे उन्हाने करपल्यामुळे शेतकरी हतबल झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खेडयांना भुस्खलनाचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(१९) ३९६६ (१५-०७-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २०० खेड्यांना भुस्खलनाचा धोका असल्याचा दावा केल्याचे भूगर्भ सर्वेक्षण विभागाने (जी.एस.आय.) प्रसिध्द केलेल्या अहवालाव्दारे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रेटर मुंबई महापालिकेने विनंती केल्यानंतर भूगर्भ विभागाने २२५ खेड्यांचा अभ्यास केला होता, त्यानुसार राज्यातील चार जिल्हयातील ४७ गावांना भुस्खलन सर्वाधिक धोका असल्याचे आढळले असून, हा अहवाल त्या त्या जिल्हयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भुस्खलनाच्या या धोक्याचा अभ्यास करण्यासाठी जी.एस.आय.कडून दोन शोध प्रकल्प हाती घेण्यात आले होते. या प्रकल्पांचा कालखंड २०१५ ते २०१८ असा होता. या प्रकल्पांच्या माध्यमातूनच रायगड, रत्नागिरी, ठाणे व पुणे जिल्ह्यातील लोकवस्तीला असलेल्या धोकादायक उताराची माहिती संकलित करण्यात आली, तसेच मुंबईच्या नागरी भागातील लोकवस्तीला लागून असलेल्या टेकड्यांचे धोकादायक उतारही निश्चित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भुस्खलनाचा धोका असलेल्या परिसरात सध्या राहत असलेल्या लोकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२८-०७-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) पावसाळयात अतिवृष्टीमध्ये धोकादायक दरडप्रवण क्षेत्रातील ग्रामस्थांचे शाळा, समाज मंदिरे व देवालये इ. ठिकाणी तात्पूरते स्थलांतर करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन कार्यालयीन दुरध्वनी/भ्रमणध्वनी तसेच Quick Response Team ची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली आहे. त्या त्या जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत परिसरातील शासकीय यंत्रणेला २४ तास सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. परिसरात गावदवंडी देण्यात येत आहे. संरक्षणात्मक कामे (संरक्षक भिंती बांधणे, जंगल गटार काढणे, झाडे लावणे, गॅविअन वॉल बांधणे इ.) करण्यात येत आहेत. अतिवृष्टीचे प्रमाण मोजण्यासाठी प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर पर्जन्य मापक यंत्र बसविण्यात आले आहेत.

बृहन्मुंबई महापालिकेमार्फत भुस्खलनाचा धोका असलेल्या ठिकाणावरील नागरीकांना सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून स्थलांतरीत होण्याकरीता नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. तसेच त्यांच्या सर्व संबंधित यंत्रणांना भारतीय भुवैज्ञानिक सर्वेक्षण, पुणे यांनी सुचविलेल्या उपाययोजना करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचेस्तरावरुन निर्देश देण्यात आलेले आहेत. शासनाच्या दिनांक १० जून, २०२० च्या पत्रान्वये सर्व विभागीय

आयुक्त व जिल्हाधिकारी यांना पावसाळयात होणाऱ्या संभाव्य दरडीच्या घटनांच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना व खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात टाळेबंदीमुळे घरकाम कामगार व त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आल्याबाबत

**(२०) ३९९२ (१५-०७-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.विलास पोतनीस, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाचा मुकाबला करण्यासाठी गेल्या तीन महिन्यापासून राज्यात लागू असलेल्या टाळेबंदीमुळे हातचे काम गेल्याने घरकाम करून उदरनिर्वाह करणाऱ्या सुमारे साडेचार लाख कामगार व त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र घरगुती कामगार कल्याण मंडळ अधिनियम, २००८ हा कायदा राज्यात २००९ पासून अस्तित्वात असताना अशा आपत्कालीन परिस्थितीत शासनाने त्यांना कोणताही दिलासा दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, घर कामासाठी राज्य व जिल्हास्तरावर कल्याण मंडळे स्थापन करण्याची कायद्यात तरतूद आहे. मंडळांने त्यांच्या कार्यक्षेत्रातील घर कामगारांची नोंदणी करणे, त्यांना ओळखपत्र देणे आवश्यक आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात खास तरतूद करुन या घर कामगार कल्याण मंडळासाठी अनुदान देण्याची तरतूद कायद्यात आहे. राज्य शासनाने अनुदान, लाभार्थ्यांच्या अंशदान व मंडळाने उभ्या केलेल्या निधीचा उपयोग या कामगारांच्या अडचणीसाठी करावयाचा आहे. कामगारांचा अपघात, मदत, कामगार व त्यांच्यावर अवलंबून असणारी व्यक्ती आजारी पडल्यास, वैद्यकीय उपचाराचा खर्च देणे, कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत करणे, त्याशिवाय परिस्थितीनुसार कामगारांना आर्थिक मदत देण्याचा मंडळ वेळोवेळी निर्णय घेऊ शकते, अशी कायद्यात तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, टाळेबंदीमुळे या कामगारांचा रोजगार गेला आहे, अशा आपात्कालीन परिस्थितीत त्यांना कायद्यातील तरतुदीनुसार आर्थिक मदत करणे आवश्यक होते, असे असतानाही शासनाने कोणतीही आर्थिक मदत न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदरहू कामगारांना आर्थिक मदत करण्यासाठी शासनाने समिती स्थापन केली असून, सदरहू समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या असल्यास सदरहू शिफारसीच्या अनुषंगाने घर कामगारांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०३-०९-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. महाराष्ट्र घरेलू कामगार अधिनियम, २००८ च्या कलम ३ अंतर्गत राज्यस्तरीय घरेलू कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्यात आले असून सदर मंडळामार्फत केंद्र शासन पुरस्कृत योजना राबविण्यात येतात.

(३) महाराष्ट्र घरेलू कामगार अधिनियम, २००८ च्या कलम ३ अंतर्गत राज्यस्तरीय घरेलू कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्यात आले आहे. सदर मंडळाची जिल्हास्तरावर कामे सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) घर कामगारांना आर्थिक मदत करण्यासाठी कोणतीही समिती स्थापन करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे बाळे (ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर) येथे नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(२१) ४०११ (१५-०७-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिकर, श्री.सदाशिव खोत : तारांकित प्रश्न क्रमांक २१२ ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे-बाळे (ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर) येथे नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे शासनाने तत्वत: मान्यता दिली असून सदरील महाविद्यालय सुरु करण्यासाठी आवश्यक असलेली जमीन शेतकरी वर्गाकडून संपादित करण्याकरीता व अन्य वेगवेगळया भौतिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींना मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालय सुरु करण्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या मोबदल्याबरोबरच इतर अन्य वेगवेगळ्या भौतिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी आवश्यक असलेला निधी आणि पुरेसे मनुष्यबळास मंजूरी देण्याचा विषय लोकप्रतिनिधीच्या विनंतीनुसार मंत्री परिषदेच्या बैठकीत सादर करण्याचे निर्देश मा.पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्री/राज्यमंत्री यांनी विभागास दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्री/राज्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे आणि दिनांक ४ एप्रिल, २०१९ रोजीच्या शासन पत्रानुसार मागणी केलेल्या वेगवेगळ्या चार मुद्द्यांची परिपूर्ण माहिती जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिनांक २४ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रासोबत शासनास सादर केली असून त्या माहितीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय माहे जून, २०२१ पासून सुरु करण्यासाठी आवश्यक असलेली जमीन संपादन करण्याची मागणी केलेली सर्व माहिती शासनास प्राप्त झाल्यामुळे सदरील जमीन संपादन करण्यासाठी व अन्य वेगवेगळ्या कामासाठी आवश्यक असलेला निधी मंजूर करण्याच्या संदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (३१-०७-२०२०) :** (१), (२), (३) व (४) सोलापूर जिल्ह्यात पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यास दिनांक ०४ एप्रिल, २०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनाने तत्वत: मान्यता दर्शविली आहे.

तसेच महाराष्ट्र राज्यात उपलब्ध असलेल्या पशुधनाच्या संख्येच्या अनुषंगाने तसेच पशुवैद्यक शाखेचा विस्तार करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले पशुवैद्यक आणि त्यानुसार सद्य:स्थितीत कार्यरत असलेली पशुवैद्यक महाविद्यालये व याचा सारासार विचार करुन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत नविन पशुवैद्यक महाविद्यालये स्थापन करण्याबाबतच्या सुधारित बृहत आराखडा सादर करण्याची कार्यवाही महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाकडून करण्यात येत आहे.

सदर बृहत आराखड्याच्या मान्यतेनंतर सोलापूर जिल्हयात पशुवैद्यक महाविद्यालय स्थापन करण्याबाबत यथोचीत निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## फळपीक विम्यातील चुकीच्या ट्रिगरमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(२२) ४०५४ (३१-०७-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फळपीक विमा योजनेतील सन २०१९-२०२० मधील अवेळी पावसाच्या हवामान धोक्याचा ट्रिगर २०२०-२०२१ मध्येही कायम ठेवला गेला असून कमी-जास्त तापमानाचे ट्रिगरमध्ये फेज १-२ मध्ये तुकडे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई कमी मिळेल याची काळजी अधिक घेण्यात आल्याचे दिसून येत आहे, कमी तापमानाच्या ट्रिगरमध्ये ही तीन स्वतंत्र ट्रिगर तयार केले गेले असून सलग दिवस वाढवून तापमान ट्रिगर कमी करणे, विमा संरक्षित रक्कम कमी करणे, जास्त तापमानाच्या ट्रिगर मध्ये तीन वेगळे ट्रिगर करुन विमा संरक्षित रक्कम कमी-जास्त करणे असा प्रकार कृषी विभागाकडून करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉकडाऊनच्या कालावधीत कृषी खात्याने विमा योजनेची नियमावली परस्पर ठरवली असून कोणत्या शेतकरी प्रतिनिधींना, विद्यापीठ शास्त्रज्ञांशी चर्चा करुन नियमावली ठरवली हे कृषी खात्याने जाहीर केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, 'पोकरा' योजनेचा किंवा खरीप तयारीचा 'वेबिनार' होतो मग विमा योजनेचा 'वेबिनार' का घेतला जात नाही, घाईघाईने कशासाठी परस्पर योजना जाहीर केली गेली, कोणत्या कारणास्तव शासनाचे नुकसान करणारे ट्रिगर बदलले गेले, बैठकीचे इतिवृत्त का जाहीर केले गेले नाही, असा आरोप विमा अभ्यासक शेतकरी अरविंद तट्टे यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन याबाबत पारदर्शकता व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२६-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

विमा कंपनीकडून आंबिया बहार सन २०१९-२०२० मध्ये काही फळपिकांसाठी खूप जास्त विमा दर सादर केले होते, त्यामुळे हवामान धोक्याचा ट्रिगरमध्ये बदल करण्यात आले.
(२) हे खरे नाही.

आयुक्त, कृषी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजी राज्यस्तरीय तांत्रिक समितीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस कृषी विद्यापिठातील शास्त्रज्ञ तसेच राष्ट्रीय फळ संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ उपस्थित होते.
(३) हे खरे नाही.

अशा प्रकारचे आरोप केल्याबाबत निवेदन प्राप्त झाल्याचे अभिलेखावरून दिसून येत नाही. तसेच आयुक्त, कृषी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजी राज्यस्तरीय तांत्रिक समितीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त दिनांक २ मार्च, २०२० रोजी सर्व संबंधितांना पाठविण्यात आले.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

# पुण्याहून औसा या ठिकाणी आलेल्या महिलेला महापालिकेच्या घंटागाडीतून घरी सोडल्याबाबत

**(२३) ४०६० (१७-०७-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्याहून औसा या ठिकाणी आलेल्या एका महिलेची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर तिला महापालिकेच्या घंटा गाडीत बसवून क्वारंटाईनसाठी घराकडे पाठविल्याचे दिनांक १९ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औसा ग्रामीण रुग्णालयात एक रुग्णवाहिका असून संस्थात्मक विलगीकरणासाठी तीन रुग्णवाहिका असताना महिलेला रुग्णवाहिकेव्दारे घरी न सोडता उपस्थित स्वच्छता निरीक्षकाने महापालिकेच्या घंटागाडीत बसवून सोडण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०७-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणातील महिला औसा येथील ग्रामीण रुग्णालयात तपासणीसाठी गेली असता, रात्रीची वेळ असल्याने सदर महिलेला घराकडे परतण्यासाठी ऑटोरिक्षा व इतर कोणतेही वाहन उपलब्ध नव्हते. तसेच तेथे उपस्थित असलेल्या रुग्णवाहिका चालकाने सदर महिला कोविड-१९ संशयित असल्याने, घरी सोडण्यास नकार दिला. त्यामुळे मला घरापर्यंत सोडा, मी एकटी आहे व मला भिती वाटत आहे, अशी विनंती त्या महिलेने केली असता, सदर महिला ही एकटी असल्याने, मानवतेच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून तसेच नगराध्यक्ष, नगरपरिषद औसा यांच्या संमतीने, सदर महिलेस ग्रामीण रुग्णालय येथून तिच्या घरी सोडण्याकरीता नगरपरिषदेच्या निर्जंतुकीकरण व स्वच्छ करुन ठेवलेल्या घंटागाडीतून सुरक्षित घरी सोडण्यात आले. तद्नंतर सदर घंटागाडी स्वच्छ पाण्याने धुवून, निर्जंतुकीकरण करुन घेण्यात आली असल्याबाबत मुख्याधिकारी, नगरपरिषद औसा यांनी अहवाल सादर केल्याचे जिल्हाधिकारी, लातूर यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाड रायगड महामार्गाच्या कॉंक्रीट रूंदीकरणाच्या कामात अनावश्यक वृक्ष तोड झाल्याबाबत

**(२४) ४०६९ (१७-०७-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड रायगड महामार्गाच्या १० मीटर कॉंक्रीट रूंदीकरणाच्या कामात अनावश्यक तसेच १० मीटरच्या बाहेर असणारी मोठी वृक्ष तोडली जात असल्याची बाब सामाजिक व पर्यावरण प्रेमी संघटनांनी दिनांक १७ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणून दिल्यानंतर मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद यांनी डी.एफ.ओ. महाड यांना चौकशी करून संबंधितांविरोधात कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१०-०८-२०२०) :** (१) मा.आदिती तटकरे, राज्यमंत्री तथा पालकमंत्री रायगड यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४/०२/२०२० रोजी रा.म.क्र.१६६फ वरील झाडांच्या महाड ते रायगड किल्ल्याच्या दुपदरीकरणाच्या कामासंदर्भात बैठक बोलविण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये हिरवळ प्रतिष्ठानचे प्रतिनिधी, वन विभागाचे अधिकारी व राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये वृक्षतोड होत असलेल्या झाडांचे सर्वेक्षण करुन अहवाल सादर करणेबाबत मा.राज्यमंत्री यांचेकडून निर्देश देण्यात आले. त्यानुसार हिरवळ प्रतिष्ठानचे प्रतिनिधी व वन विभागाचे प्रतिनिधी यांच्यासमवेत विभागामार्फत दिनांक २७/०२/२०२० ते ०३/०३/२०२० पर्यंत झाडांचे सर्वेक्षण करण्यात आले व सर्वेक्षणानुसार राष्ट्रीय महामार्गाच्या

महाड ते रायगड (सर्वेक्षण कि.मी.०/०० ते १२/०००) किल्ल्याच्या दुपदरीकरणाच्या भूसंपादित रस्त्याच्या हद्दीमध्ये येणारी व वन विभागाची मंजूरी प्राप्त असलेली एकूण १०३८ झाडे तोडली जाणार आहेत. राष्ट्रीय महामार्गाचे दुपदरीकरणाचे व साईड पट्टीचे मुख्य काम १४ मीटर मध्ये होणार आहे. राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरणासाठी वन विभागामार्फत मंजूर करण्यात आलेली सर्वच झाडे तोडणे आवश्यक आहे व सदर झाडे राष्ट्रीय महामार्गाच्या संपादित सरासरी १८ ते २५ मीटर रुंदीमधील आहेत.

(२) राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ फ हा नव्याने घोषित झालेला राष्ट्रीय महामार्ग असून काँक्रिटव्दारे सुधारणा व दुपदरीकरणासाठी भूसंपादीत रस्त्याच्या हद्दीत येणारी झाडे तोडणे आवश्यक असून त्यास वन विभागाची मंजूरी प्राप्त असल्याने कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पीक कर्ज वाटपात दिरंगाई होत असल्याबाबत

**(२५) ४०७१ (१७-०७-२०२०). श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.महादेव जानकर** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खरीप हंगामात पीक कर्ज वाटपाबाबतची शासन व बँकांची अनागोंदी कायम असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून बीड जिल्ह्यात ८० टक्के पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी पेरण्या पूर्ण केल्या असता जिल्ह्यातील बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज वाटप केले नसून उद्दिष्टाच्या १० टक्केही रक्कम शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मराठवाडा खानदेश व विदर्भ या कोरडवाहू भागात कर्ज वाटपाचे प्रमाण सरासरी १ ते ७ टक्के तर पश्चिम महाराष्ट्रात १ ते २८ टक्के पर्यंत असून राज्यात दिनांक १४ मे, २०२० अखेर १ ते २८ टक्केच पीक कर्ज वाटप झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खरीप हंगाम साधण्यासाठी शेतकऱ्यांच्या हाती भांडवल नसल्याने तसेच शासन फक्त कोरोना नियंत्रणाच्या कामात मग्न असल्याने ग्रामीण भागाला संजीवनी देणारा खरीप हंगाम भांडवलाच्या उपलब्धतेअभावी वाया जाण्याची भिती शेतकरी वर्गात पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पीक कर्जासाठी जिल्हाधिकारी कागदपत्रांची आवश्यकता नसल्याचे सांगत असूनही बँक अधिकारी कागदपत्रांसाठी शेतकऱ्यांची पिळवणूक करीत असल्याने सदर बँकावर मा.गृह मंत्री हे फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे सांगत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कागदपत्रासाठी अडवणूक करणाऱ्या बँकावर कारवाई करुन शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२७-०७-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.

बीड जिल्हयासाठी खरीप कर्ज वाटपाचा रुपये ९५० कोटी रकमेचा लक्षांक देण्यात आला आहे. सदर कालावधीत बीड जिल्हयातील कर्ज वाटप १४.७६ कोटी असल्याचे दिसून येते. याबाबत प्रामुख्याने कोविड-१९ महामारीमुळे उध्दवलेल्या लॉकडाऊन परिस्थितीत बँकांमधील निवडक-अपुरा कर्मचारी वर्ग, दळणवळण सुविधेचा अभाव इत्यादी कारणामुळे बँकांना कर्ज वितरणाची कार्यपध्दती अनुसरण्यास विलंब झाला आहे.

तथापि दिनांक १५/०७/२०२० अखेर बीड जिल्हयात २९१.९८ कोटी (३१%) कर्ज वाटप करण्यात आले आहे.

(२) अंशतः खरे आहे.

खरीप हंगामातील पीक कर्ज वाटपाच्या अनुषंगाने दिनांक १५/०५/२०२० पर्यंत राज्यातील बँकांनी ६.७७ लाख शेतकऱ्यांना रुपये ४,६५० कोटी रकमेचे पीक कर्ज वाटप केले आहे.

(३) नाही.

(४) अंशतः खरे आहे.

राष्ट्रीयकृत बँका शासनाचे नियमाप्रमाणे शेतकऱ्यांनी मागणी करुनही पीक कर्ज वाटप करीत नसल्यास किंवा शासनाच्या आदेशाचे व नियमांचे पालन करीत नसल्यास त्याबाबत संबंधित बँकेविरुध्द पोलीस विभागाकडे तक्रार करण्याबाबत मा.मंत्री (गृह) यांनी दिनांक २४/०६/२०२० च्या पत्राव्दारे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविले आहे.

(५) राज्यातील शेतकऱ्यांना खरीप, २०२० च्या हंगामामध्ये बँकामार्फत पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी शासनामार्फत दिनांक २१/०५/२०२० रोजीच्या राज्यस्तरीय खरीप आढावा सभेमध्ये दिनांक २९/०५/२०२० रोजीच्या राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या विशेष सभेमध्ये त्याचप्रमाणे दिनांक १७/०६/२०२० रोजीच्या मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेमध्ये बँकांना त्याचप्रमाणे क्षेत्रिय अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परिणामी दिनांक १५/०७/२०२० पर्यंत राज्यातील बँकांमार्फत २६.८५ लाख शेतकऱ्यांना रुपये १९,८०२ कोटी रकमेचे पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे. खरीप कर्ज वाटपाचा लक्षांक रुपये ४५,७८६ कोटी रकमेचा असून उक्त साध्य पीक कर्ज वाटपाचे प्रमाण ४३% आहे. गतवर्षी दिनांक १५/०७/२०१९ अखेर राज्यातील बँकांनी १९.४५ लाख शेतकऱ्यांना रुपये १४,५५४ कोटी रकमेचे पीक कर्ज वाटप केले होते. या तुलनेत चालू हंगामातील कर्ज वाटप अधिक प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना सीसीआय व कापूस पणन महासंघाकडून चुकारे मिळण्याबाबत

**(२६) ४०८४ (१५-०७-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांचे कापूस खरेदीकरीता शासनाने सीसीआय व कापूस पणन महासंघाव्दारे १२३ लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात येवूनही खरेदी केलेल्या कापसाचे चुकारे ६९३ कोटी शेतकऱ्यांना मिळाले नसल्याचे दिनांक ३० मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप हंगामाची वेळ येवूनही शेतकऱ्यांना कापूस विक्री केलेले पैसे पणन महासंघाकडून मिळाले नसल्याने हंगामात आर्थिक अडचणीचा सामना करण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत असल्याने सदर चुकारे शासन देणार आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना सदर चुकारे देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२७-०७-२०२०) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

मे, २०२० अखेर कापूस पणन महासंघाव्दारे एकूण रुपये ३६६७ कोटी इतक्या मूल्याचे ६८.५५ लक्ष क्विंटल कापूस खरेदी करण्यात आली आहे. त्यापैकी रुपये ३०५९.७८ कोटींचे चुकारे शेतकऱ्यांना अदा करण्यात आले होते व उर्वरित रुपये ६०७.२२ कोटींचे चुकारे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अदा करण्याची कार्यवाही कापूस पणन महासंघाकडून सुरू होती.

तसेच, सीसीआयमार्फत मे, २०२० अखेर एकूण ११०.७२ लक्ष क्विंटल कापसाची खरेदी झालेली होती. शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये कापसाचे चुकारे वर्ग करण्याची कार्यवाही सीसीआयव्दारे चालू होती.

(२) दिनांक २१ जुलै, २०२० अखेर कापूस पणन महासंघाव्दारे एकूण ३,३२,६४० शेतकऱ्यांकडून एकूण रुपये ४,८४७.१० कोटी इतक्या मूल्याचे ९०.७८ लक्ष क्विंटल कापूस खरेदी करण्यात आलेले असून त्यापैकी रुपये ४,२३४.८८ कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आलेली आहे. उर्वरित रुपये ६१२.२२ कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्याची कार्यवाही कापूस पणन महासंघाव्दारे प्रगतीपथावर आहे.

तसेच, सीसीआयव्दारे दिनांक २१ जुलै, २०२० अखेर एकूण ५,३०,१८० शेतकऱ्यांकडून एकूण रुपये ६९२९.७९ कोटी इतक्या रकमेचा एकूण १२७.६० लक्ष क्विंटल कापूस खरेदी करण्यात आलेला असून त्यापैकी रुपये ६७९४.५९ कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आलेली असून उर्वरित रुपये १३५.२० कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्याची कार्यवाही सीसीआयव्दारे सुरू आहे.

(३) कापूस पणन महासंघाला शेतकऱ्यांचे चुकारे वेळेवर आधार करण्यासाठी बँकेकडून कर्ज घेण्यासाठी दिनांक ५ मार्च, २०२० रोजी मंत्रिमंडळाने रुपये १८०० कोटी इतक्या रकमेची शासन हमी दिलेली आहे. तसेच, दिनांक २५ जून, २०२० रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कापूस पणन महासंघाला अजून रुपये १००० कोटी इतके अतिरिक्त कर्ज घेण्याकरीता शासन हमी देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. अशाप्रकारे एकूण रुपये २८०० कोटी इतक्या कर्जास शासनाव्दारे कापूस पणन महासंघाला शासन हमी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(२७) ४११५ (१६-०७-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत (एस.आर.ए.) गत २४ वर्षात सरासरी ८५०० च्या दराने फक्त ३ लाख ६ हजार झोपडपट्टीवासियांना घरे हस्तांतरित केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील कोरोनाचे संकट दाटीवाटीच्या झोपडपट्ट्यांमुळे तीव्र होत असल्याची टीका नागरिकांकडून होत असून मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकासाचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याची माहिती माहे एप्रिल, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबईतील झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जितेंद्र आव्हाड (१३-०८-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने आजमितीस २,१०,५३६ पुनर्वसन सदनिका हस्तांतरित केलेल्या आहेत.

(२) व (३) हे खरे नाही. झोपडपट्टी पुनर्वसन योजना गतीने पूर्ण करण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे विविध प्रकारच्या उपाययोजना केल्या जात आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे ओणी तिसेवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील ग्रामस्थांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याबाबत

**(२८) ४१३३ (१५-०७-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ओणी तिसेवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे गतवर्षी अतिवृष्टीमुळे भुस्खलन होऊन अनेक घरे खचली असल्याने मागील कित्येक वर्षापासून रहिवाशी असलेले तेथील ग्रामस्थ बेघर झाल्याची बाब माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भविष्यात याठिकाणी वास्तव्य करणे धोक्याचे असल्याने सुरक्षितेच्या दृष्टीने तेथील ग्रामस्थांचे पुनर्वसन करणे गरजेचे असल्याने एक वर्ष होऊनही येथील ग्रामस्थांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाबाबत प्रशासन स्तरावरून कोणतीही दखल घेण्यात न आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ठिकाणी भुस्खलनामुळे बेघर झालेल्या ग्रामस्थांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२४-०८-२०२०) :** (१) माहे ऑगस्ट, २०१९ रोजी अतिवृष्टीने भुस्खलन होऊन मौजे ओणि तिसेवाडी ता.राजापूर, जि.रत्नागिरी येथील तीन घरांचे नुकसान झाले होते. तीनही बाधितग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

(२) नाही.

(३) वरील १ प्रमाणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणातील शेतकऱ्यांना खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत

**(२९) ४१३४ (१५-०७-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संकटामुळे सर्व कामधंदे ठप्प असताना पुन्हा निसर्ग चक्रीवादळाच्या थैमानाने कोकणातील शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून अशा परिस्थितीत शासनाने कोकणातील पाच जिल्ह्यांकरीता खरीप पीक कर्ज हंगामासाठी रुपये १ हजार १५२ कोटी ६० लाख निश्चित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील उद्दिष्टांपैकी बँकांनी ६७ हजार १६८ शेतकऱ्यांना फक्त ११९ कोटी ५१ लाख ८२ हजार रकमेचे पीक कर्ज वितरीत केल्याची माहिती माहे जून, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोकणातील शेतकऱ्यांना खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२७-०७-२०२०) :** (१) होय.

कोकणातील पाचही जिल्ह्यांकरीता खरीप पीक कर्जासाठी रुपये ११५२६४ लाखाचे उद्दीष्ट आहे.

(२) व (३) नाही.

कोकणातील पाचही जिल्ह्यांमध्ये दिनांक १५/०७/२०२० पर्यंत एकूण १,१३,८७३ शेतकऱ्यांना रुपये ४४१.२६ कोटी पीककर्ज वाटप करण्यात आले आहे. कर्जवाटपासंदर्भात विभागीय आयुक्त, कोकण यांचे दिनांक ०३/०१/२०२० रोजीच्या परिपत्रकातील सुचनांनुसार तसेच गठीत करण्यात आलेल्या तालुकास्तरीय तसेच ग्रामस्तरीय समितीमार्फत प्रत्येक गावपातळीवरील शेतकऱ्यांपर्यंत पोहचून त्यांना बँक शाखांशी संलग्न करुन जास्तीत जास्त कर्ज वाटप करण्याचे त्याचप्रमाणे संबंधित जिल्हाधिकारी यांना जिल्हास्तरीय समितीच्या सभा घेऊन जास्तीत जास्त कर्ज वाटप करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी पाचही जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक २०/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजश्री शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती योजनेतील क्रिमिलिअरची अट रद्द करण्याबाबत

**(३०) ४१६१ (१५-०७-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्यावतीने अनुसूचित जाती मधील विद्यार्थ्यांच्या विशेष अध्ययनमध्ये दिनांक ५ मे, २०२० च्या शासन निर्णयानुसार राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्तीमध्ये बदल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांसाठी ६ लाख रुपयांची क्रिमिलिअरची अट या नव्या सुधारणामध्ये अनिवार्य केली असल्याने ही बाब अनुसूचित जाती विद्यार्थ्यांसाठी अन्यायकारक ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गासाठी सोयी-सवलती देत असताना भारतीय संविधानाने मार्गदर्शक केलेल्या तत्वाचा पूर्णत: विसंगत असल्याने सदर केलेली दुरुस्ती रद्द करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.सामाजिक न्याय मंत्री यांचेकडे पत्राव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक ५ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयामुळे राजश्री शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती योजनेमध्ये लागू करण्यात आलेली क्रिमिलिअरची अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१०-०८-२०२०) :** (१) अंशत: होय, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत उत्पन्न मर्यादेच्या निकषात बदल करण्याचा निर्णय दिनांक ५ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.
(२) नाही, दिनांक १६ जून, २०१५ च्या शासन निर्णयापासून परदेश शिष्यवृत्तीसाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रुपये ६.०० लक्ष असून, तीच कायम आहे. नव्याने रुपये ६.०० लक्षची मर्यादा अथवा क्रिमिलिअरची मर्यादा टाकण्यात आलेली नाही.
(३) होय, अशा स्वरुपाची मागणी लोकप्रतिनिधींनी केलेली आहे.
(४) विविध लाभार्थी घटकांकडून मत-मतांतरे प्राप्त होवू लागल्याने व सर्व लाभार्थी घटकांसोबत व्यापक चर्चा करुन निर्णय घेणे आवश्यक असल्याने, दिनांक ०५/०५/२०२० च्या शासन निर्णय व त्याआधारे प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात दिनांक २१/०५/२०२० च्या शासन निर्णयान्वये स्थगित करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विविध कारागृहातील कोरोनाबाधित कैद्यांच्या विलगीकरणासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३१) ४१८५ (१५-०७-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कारागृहातील चार कच्च्या कैद्यांचा कोरोनामुळे मृत्यू झाला असून कोरोनाबाधित कैद्यांच्या विलगीकरणासाठी कारागृहात जागाच नसल्याचे दिनांक १७ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विविध कारागृहात क्षमतेपेक्षा अधिक कैद्यांना ठेवण्यात आल्याने कारागृहात कोरोना विषाणूचा संसर्ग वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील विविध कारागृहातील कैद्यांना कोरोनाचा संसर्ग होवू नये, याकरीता कोरोनाबाधित कैद्यांच्या विलगीकरणासाठी जिल्हाधिकारी पातळीवर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख (२८-०७-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे,

कोरोनाबाधित बंद्यांच्या विलगीकरणासाठी कारागृहामध्ये जागा उपलब्ध नाही हे खरे आहे. तथापि, सदर ३ बंद्यांना इतर आजाराचे उपचारास्तव शासकीय रुग्णालयात दाखल केले असता, उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच १ बंद्यांने कारागृहामध्ये गळफास घेवून आत्महत्या केली. बंद्यांचे स्वॅब (swab) तपासणीअंती कोरोना पॉझिटीव्ह आलेला आहे.

(२) होय.

(३) कारागृहात कोरोना विषाणू या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्याकरीता बंद्यांना ठेवण्यासाठी तात्पूरते कारागृह घोषित करणेकरीता सर्व जिल्हाधिकारी यांना दिनांक १५ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच सर्व जिल्हाधिकारी यांना तात्पूरते कारागृह स्थापित करुन तेथे Covid Care Centre स्थापन करण्यास दिनांक २४/०६/२०२० रोजी आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार २८ जिल्ह्यामध्ये तात्पूरते कारागृह स्थापन झाले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: विदर्भात शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(३२) ४१८६ (१५-०७-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: विदर्भात नागपूर, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व वर्धा जिल्ह्यात नविन वर्षाच्या सुरुवातीस झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीठामुळे शेतकऱ्यांच्या धान, सोयाबीन, कापूस व रब्बी हंगामाचे तूर, हरभरा, धना या पिकांचे नुकसान झाल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२० तसेच माहे एप्रिल-मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाल्याने वादळी पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांची पिके फळबागा व भाजीपाला यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांवर कधी अवकाळी पाउस, गारपीठ तर कधी करोना विषाणुजन्य आजार सारखे संकट उध्दवल्याने शेतकऱ्यांच्या मालाला कवडी मोल भाव मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून सदर शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्याकरीता शासनाने शेतकऱ्यांचे कृषी पंपाचे वीज बील माफ व कृषी कर्जाला स्थगिती देणाबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर गारपीठ, अवकाळी तसेच वादळी पाऊसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२८-०७-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सन २०१९-२०२० या वर्षामध्ये राज्यातील २ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून दुष्काळी भागात उपाययोजना व सवलती लागू करण्याबाबतचे निदेश दिनांक ३१/१०/२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत. त्यास अनुलक्षून सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने पीक कर्जाचे पुनर्गठन व शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्याबाबतच्या उपाययोजना लागू केल्या आहेत.

(३) स्थानिक महसूली प्रशासनाला पंचनामे करून कृषी आयुक्त, पुणे यांच्यामार्फत प्रस्ताव सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात चटईक्षेत्रफळाचे सर्वाधिकार उपमुख्य अभियंता यांना प्रदान केल्याबाबत

**(३३) ४२०१ (१६-०७-२०२०). डॉ. परिणय फुके, श्री. प्रविण दरेकर, श्री. सुरेश धस, श्री.निलय नाईक, ॲड निरंजन डावखरे सन्माननीय गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील सुमारे ४०० ते ५०० कोटी किंमतीच्या चटई क्षेत्रफळाच्या वितरणाचे सर्वाधिकार उपमुख्य अभियंता रामा मिटकर यांच्या समितीला प्रदान करण्याचा निर्णय अलिकडेच मा.गृहनिर्माण मंत्री यांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चटईक्षेत्रफळ वितरणासोबत शिथिलता देण्याचे अधिकारही या समितीला देऊन थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अधिकारालाच आव्हान देण्यात आले आहे तसेच म्हाडा उपाध्यक्षांकडे असलेले अंतिम अधिकार उपमुख्य अभियंत्यांकडे सुपूर्द करण्यात आल्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात समांतर यंत्रणा उभी राहणार आहे काय,

(३) असल्यास, झोपडीवासीयांना ३१ चौरस फुटाचा लाभ मिळणार असल्याचे दाखविण्यात आले असले तरी, फंजीवल चटई क्षेत्रफळ व इतर शिथिलता लक्षात घेता विकासकांना ४०० ते ५०० कोटींचे चटई क्षेत्रफळ मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (११-०८-२०२०) :** (१) व (२) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील तदतूदीनुसार ३०० चौ. फूट एवढया वाढीव आकारमानाच्या पुनर्वसन सदनिका पात्र लाभार्थ्यांना देण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात नियमानुसारच स्वतंत्र कक्षाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

म्हाडा उपाध्यक्षांकडे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकार नाहीत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कोळी समाजातील मागास वर्गाला अनुसूचित जमातीतील आदिवासी कुटुंबियांप्रमाणे लाभ मिळणेबाबत

**(३४) ४२१२ (१५-०७-२०२०). श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती नाजूक असलेल्या व स्वखर्चाने निवारा बांधण्यास सक्षम नसलेल्या दुर्गम भागातील अनुसूचित जमातीतील आदिवासी लोकांना घर कर्ज योजना, बीज भांडवल योजना, प्रशिक्षण योजना, अशा प्रकारच्या अनेक सुविधांचा लाभ शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत दिला जातो परंतु अनुसूचित जमातीतील कोळी बांधवांना अशा प्रकारचा कोणत्याही योजनेचा लाभ मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२० च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जाती व जमातीतील मागास असलेल्या कोळी समाजास शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत असणाऱ्या या सर्व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२७-०७-२०२०) :** (१) नाही.
(२) अनुसूचित जमातीसाठी असलेल्या शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत असणाऱ्या सर्व योजना केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीमधील सर्व जमातींना या योजना लागू आहेत. त्यामध्ये क्र. २८ वर कोळी ढोर, टोकरे व क्र. २९ वर कोळी महादेव, डोंगर कोळी व क्र. ३० वर कोळी मल्हार यांचा समावेश आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे आपटी-बोरघर (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील ग्रामपंचायतीची इमारत बांधण्यासाठी अनुदान मंजूर करणेबाबत

**(३५) ४२१६ (१७-०७-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आपटी-बोरघर (ता.दापोली, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायतीचे कार्यालय भाड्याच्या खोलीमध्ये सुरु असल्याने ग्रामपंचायत इमारत बांधुन मिळणेबाबत ग्रामस्थांकडून मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीची इमारत बांधण्यासाठी लोकप्रतिनिधींनी अनुदान मंजूर करणेबाबत शासनाला निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीची इमारत बांधण्यासाठी अनुदान मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (३१-०८-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील आपटी बोरघर ग्रामपंचायतीच्या नवीन कार्यालयीन इमारतीच्या बांधकामासाठी सन २०१५-२०१६ मध्ये जन सुविधा योजनेंतर्गत प्रस्ताव प्राप्त झाला होता. तथापि, सदर कामास जिल्हा नियोजन विकास समितीने मान्यता दिली नाही. त्यामुळे सन २०१९-२०२० मध्ये सदर योजनेंतर्गत जिल्हा नियोजन विकास समितीकडे प्रस्ताव फेरसादर केलेला असून त्यास जिल्हा नियोजन विकास समितीची अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही.

महाराष्ट्र राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची स्वत:च्या मालकीची कार्यालयीन इमारत नाही अशा ग्रामपंचायतींना बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी या राज्य योजनेंतर्गत नवीन कार्यालयीन इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान ही स्वतंत्र योजना असून या योजनेंतर्गत देखील ज्या ग्रामपंचायतींची स्वत:च्या मालकीची कार्यालयीन इमारत नाही अशा ग्रामपंचायतींना नवीन कार्यालयीन इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्तुत योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे आपटी-बोरघर (ता.दापोली) या ग्रामपंचायतीच्या नवीन कार्यालयीन इमारत बांधणीसाठी राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान या योजनेतून निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयात गर्भपातासाठी एमटीपी किटची विक्री होत असल्याबाबत

**(३६) ४२१९ (१६-०७-२०२०). श्री.अंबादास दानवे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात गर्भपातासाठी एमटीपी किटची विक्री डॉक्टरांच्या प्रिस्कीप्शन विना होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच अद्यापपर्यंत किती आरोपींवर गुन्हा दाखल होऊन शिक्षा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे (१४-०९-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सदर प्रकरणी १) स्वप्ना प्रदीप सर्जे पेढीमालक येस फार्मा, २) प्रदीप सर्जे, (स्वप्ना सर्जे यांचे पती) ३) गजानन औंकार नरवडे, ४) हर्षल रविंद्र चौधरी, पेढीमालक आर.के.मेडिकोज, ५) रुपेश पाखरे पेढीमालक जे.बी. मेडिकोज व ६) सागर दयानंद संगम या सहा आरोपींविरुध्द एमआयडीसी, सिडको पोलीस स्टेशन औरंगाबाद येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला असून त्याचा प्रथम खबर अहवाल क्र. ००३५ दिनांक २६/०१/२०२० हा आहे. या सहा आरोपींस पोलिसांनी अटक केली असून त्यांची जमीनावर सुटका करण्यात आली आहे.

येस फार्मा सिडको, औरंगाबाद, जे.बी. मेडिकोज, संजय नगर औरंगाबाद व आर.के. मेडिकोज, गारखेडा, पुंडलिक नगर रोड, औरंगाबाद या गुन्ह्याशी संबंधीत तीन पेढयांना परवाने निलंबित अथवा रद्द का करण्यात येऊ नयेत याबाबत खुलासा करणेस्तव सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद कार्यालयामार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून सदर पेढयांची प्रत्यक्ष सुनावणी सहायक आयुक्त (औषधे) परीमंडळ-१, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद यांचे समोर घेण्यात आली आहे व तीनही पेढयांचे परवाने कायमस्वरुपी रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला शहरातील जठारपेठ भागाला उड्डाण पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३७) ४२३७ (१७-०७-२०२०). डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरातील जठारपेठ भागाला रेल्वे गेटवरुन न्यु तापडिया नगरशी जोडणा-या उड्डाण पुलाकरीता शासनाने भरीव निधी मंजूर करुन तसेच निविदा प्रसिध्द करुनही उड्डाणपुलाचे कामास सुरुवात झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाण पुलाचे काम करताना येथील स्थानिक रहिवाश्यांना विश्वासात घेण्यात आलेले नसून उक्त उड्डाण पुल हा रेल्वे गेटच्या वरुन जात असल्यामुळे या कामाकरिता आरबीओची परवानगी देखील घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर पुलाच्या कामाची कालमर्यादा निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२८-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही. सदर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक १३/१२/२०१८ रोजी मे.शारदा कंस्ट्रक्शन प्रा.लि. नांदेड या कंत्राटदारास देण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत काम प्रगती पथावर असून १२/१२/२०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच रेल्वे विभागाकडून GAD मंजूर झाल्यानंतर रेल्वे हद्दीतील १४४ मी. लांबीच्या गाळ्यांचे काम हाती घेण्यात येईल.
(२) हे खरे नाही, सदर कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर रेल्वे उड्डाणपुलाच्या सर्वसाधारण आराखडयास रेल्वे प्रशासनाकडून मंजुरी देण्यात आली आहे. तसेच स्थानिक अकोला मनपा प्रशासनाकडून सातव चौक ते रेल्वे गेट ३० मी. रस्ता रुंदीनुसार रेल्वे उड्डाणपुलाची आखणी करण्याची परवानगी देण्यात आली असून सदर कामास सुरुवात करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रिलायन्स जियो कंपनीकडून दंडात्मक रकमेची वसूली करण्याबाबत

**(३८) ४२७१ (१६-०७-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयात शासनाची कोणतीही परवानगी न घेता रिलायन्स जियो कंपनी खोदकाम तथा उत्खनन करुन बेकायदेशीररित्या ऑप्टिकल फायबर केबल टाकल्याप्रकरणी शासनाने रुपये २६ कोटींचा दंड दिनांक २२ जून, २०१८ रोजी आकारला होता, जिल्हाधिकारी, परभणी यांनी रिलायन्स जियो कंपनीस नोटीस देऊन देखील प्रतिसाद न दिल्यामुळे संबंधितांवर कारवाई करावी व दंडाची रक्कम वसूल करावी याबाबत लाइफ इं लाईट या संस्थेने दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी जिल्हाधिकारी, परभणी व प्रधान सचिव, महसूल विभाग यांना देखील लेखी निवेदनाव्दारे कळविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिलायन्स जियो इन्फो कॉम.लि., या कंपनीने केलेल्या अवैध गौण खनिज उत्खननापोटी रिलायन्स जियो या कंपनीच्या चल व अचल मालमत्तेची माहिती घेऊन दंडात्मक रकमेची वसूली करण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास कळविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार रिलायन्स जियो कंपनीकडून आर्थिक दंड वसूल करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई यांनी रिलायन्स जिओ कंपनीचे मुंबई येथील मालमत्ता जप्त करुन त्याची लिलाव प्रक्रिया पूर्ण केली आहे काय, याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई यांच्याकडून करण्यात आलेल्या कारवाईची सविस्तर माहिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिलायन्स जियो कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२९-०७-२०२०) :** (१) उक्त प्रकरणी लाइफ इं लाईट या संस्थेचे दिनांक २० जानेवारी, २०२० रोजीचे निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, परभणी यांचे दिनांक २१/१/२०२० रोजीचे पत्र जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना दिनांक ३०/१/२०२० रोजी प्राप्त झाले आहे.
(३) व (४) अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक १०/६/२०१९ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थी जियो कंपनीचे अपील फेटाळून अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी आकारलेल्या दंडात्मक रक्कमेचे आदेश कायम केले होते. सदर दंडात्मक रकमेच्या वसूलीबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांच्या दिनांक २१/१/२०२० रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम २६७ नुसार रुपये २५,९५,६३,७५०/- इतक्या दंडात्मक रकमेची मागणीची दिनांक ३१/०१/२०२० रोजीची नोटीस जिओ कंपनीच्या मुंबई येथील कार्यालयास बजाविण्यात आली आहे. सदर नोटीसीच्या अनुषंगाने सदर कंपनीने अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या दिनांक १०/६/२०१९ रोजीच्या आदेशाविरुध्द अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे पुनर्विलोकन अर्ज सादर केला असून अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी पुनर्विलोकन अर्जावर निर्णय होईपर्यंत उक्त दंडात्मक रक्कमेच्या वसूलीस स्थगिती दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सजा दादेगाव (ता.आष्टी, जि.बीड) येथील तलाठी व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३९) ४२८२ (१५-०७-२०२०). श्री.सुरेश धस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सजा दादेगाव (ता.आष्टी, जि.बीड) येथे कार्यरत तलाठ्याने जनावरांच्या छावणी गैरव्यवहार, दुष्काळी अनुदान, पीक विमा, जमिनीचे फेरफार, सातबारा बदल करणे इत्यादी गैरप्रकार केल्यामुळे उक्त तलाठ्यास सेवेतून निलंबित करण्यात आले होते, तसेच त्याचेवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल असून अंतरीम जामीनही मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सजा तलाठी सतत गैरहजर असल्याने लोकप्रतिनिधींनी विचारणा केली असता “मी उपविभागीय अधिकारी यांना रुपये एक लाख महिना देतो, मी कोणाला घाबरत नाही” असे उत्तर देऊन लोकप्रतिनिधींना दमदाटी केल्याचे प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिशय गंभीर गुन्ह्यात निलंबन होऊनही सदर तलाठ्याची पुन्हा त्याच तालुक्यात त्याच सजावर नियुक्ती केली आहे, सदर तलाठ्याची कोणत्या नियमाव्दारे नियुक्ती केली आहे याबाबत उपविभागीय अधिकारी, बीड यांचेकडे लेखी पत्राव्दारे विचारणा केली असता उपविभागीय अधिकाऱ्यांनी लेखी पत्राला कोणतेही उत्तर दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशा तलाठ्यावर व त्यास पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (३१-०७-२०२०) :** (१) सजा दादेगाव (ता.आष्टी, जि.बीड) येथे कार्यरत तलाठ्याने जनावरांच्या छावणी गैरव्यवहार, दुष्काळी अनुदान, पीक विमा, जमिनीचे फेरफार, सातबारा बदल करणे इ. गैरप्रकार केल्यामुळे संबंधित तलाठ्यास सेवेतून निलंबित करण्यात आले होते. तसेच त्यांचेवरील ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी अटकपूर्व जामिन मंजूर केलेला आहे.

(२) अशी बाब उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा यांचे कार्यालयास निदर्शनास आलेली नाही.

(३) उपविभागीय अधिकारी, पाटोदा यांनी त्यांचे दिनांक २२/०७/२०२० च्या पत्रान्वये सन्माननीय विधानपरिषद सदस्यांना वस्तुस्थिती अवगत केली आहे.

(४) व (५) संबंधित तलाठी यांची विभागीय चौकशी चालू आहे. विभागीय चौकशीअंती संबंधितांविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल. तसेच संबंधित तलाठ्यास परस्पर पदभार सोपविल्याबाबत तहसिलदार, आष्टी यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे.

---

## अकोला जिल्हयात सामाजिक न्याय भवन बांधण्याबाबत

**(४०) ४२९३ (०५-०८-२०२०). डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयामध्ये स्वतंत्र सामाजिक न्याय भवन बांधण्याच्या प्रस्तावाची सर्व प्रशासकीय प्रक्रिया पार पडून सहा महिने उलटूनही कंत्राटदाराने काम सुरु केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन शासनाने मंजूरी देऊन देखील सामाजिक न्याय भवन बांधण्याचे काम सुरु केले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक न्याय भवनाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१७-०७-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. दिनांक ०८/०१/२०२० पासून इमारत बांधकामास सुरुवात करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खोपोली-पाली-वाकण मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(४१) ४३१७ (१६-०७-२०२०). ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ ला जोडणाऱ्या खोपोली-पाली-वाकण या मार्गाच्या चौपदरीकरणासाठी रुपये १९८ कोटी मंजूर होऊन बेग या ठेकेदाराला कामाचा ठेका दिल्यानंतर ३ वर्षांचा कालावधी होवूनही सदर रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामासाठी गत ३ वर्षात २ कंत्राटदार बदलण्यात आले असून रस्त्याच्या अर्ध्या भागात काँक्रीटीकरण केले आहे तर काही ठिकाणी रस्त्याच्या मध्येच खोदून ठेवल्याने धुळीचे लोट उसळत असून रोज लहान-मोठे अपघात होवून वाहनचालकांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याचे काम सद्य:स्थितीत पूर्णत: बंद झाले असून नव्या ठेकेदारानेही काम सोडून दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२०-०८-२०२०) :** (१) होय.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग विभाग (MoRTH), मंत्रालयाने नव्याने घोषित राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ मधील वाकण फाटा ते पाली फाटा असे ४०.६० कि.मी. (२ lane with paved shoulder) बांधकाम EPC तत्वावर केंद्रीय मंत्रालयाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई मार्फत हाती घेण्यात आला असून मे.वराह इन्फ्रा लि. जोधपुर तर्फे दुय्यम कंत्राटदार मे.बेग कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत सुरु आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

सदरील ठेकेदाराने मान्सुनपूर्व तयारी करतांना कामासाठी केलेली खोदाई समपातळीत आणलेली असून सदरील रस्ता रहदारीसाठी सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(३) व (४) सदरचे काम बंद पडलेले नसून, ठेकेदार परप्रांतातील असल्यामुळे कोविड-१९ मुळे ठेकेदाराकडील मजुर व इतर कर्मचारी काही कालावधीकरीता गावी निघून गेल्याने दोन महिने काम बंद होते. याबाबत, सदर ठेकेदारास नोटीस देण्यात आली होती. मा.श्री.नितीनजी गडकरी, केंद्रीय मंत्री, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६/०६/२०२० रोजी झालेल्या बैठकीत सदर कंत्राटदारास कामाची गती वाढवून काम लवकर पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. सद्य:स्थितीत पुनश्च: दर्जोन्नतीचे काम सुरु करण्यात आले आहे. तथापि, पाऊस जादा असल्याने काम जलदगतीने करणे शक्य होत नाही. तसेच, पावसाळयात रस्ता सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुरुडी (ता.आष्टी, जि.बीड) येथील शासकीय आदिवासी माध्यमिक आश्रमशाळेच्या इमारतीचे मूल्यांकन प्रलंबित असल्याबाबत

**(४२) ४३६३ (१०-०७-२०२०). श्री.सुरेश धस** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरुडी (ता.आष्टी, जि.बीड) येथील शासकीय आदिवासी माध्यमिक आश्रमशाळेचे स्थलांतर सध्या सर्व सोयींनी युक्त अशा नवीन चार मजली इमारतीमध्ये करण्यात आले असून सदर इमारतीच्या मूल्यांकनाचा प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, औरंगाबाद यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक अभियंता क्रमांक-२ यांना पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर कार्यकारी अभियंता क्रमांक-२ यांनी कोणतीही कार्यवाही केली नसून उक्त प्रस्ताव उपविभाग, आष्टी यांच्याकडे पाठवण्यासाठी संबंधित मालकाकडे मोठया रकमेची मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी मुलांच्या भवितव्याचा प्रश्न असल्याने उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर इमारतीचे मूल्यांकन करुन दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०५-०८-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सदर प्रस्ताव कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ यांनी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, आष्टी यांच्याकडे ऑनलाईन पाठविलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील लाभार्थी शेतकऱ्यांना शेततळ्याचे अनुदान देण्याबाबत

**(४३) ४३७४ (१५-०७-२०२०). डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यात शासनाच्या कृषी विभागाने मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गत अनेक शेतकऱ्यांना शेततळे मंजूर केले असून सन २०१८-२०१९ या वर्षात ५० लाभार्थी व सन २०१९-२०२० या वर्षात ११५ लाभार्थ्यांचे अनुदान शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (२९-०७-२०२०) :** (१) व (२) होय, हे अंशत खरे आहे. सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील प्रलंबित शेततळ्यांचे अनुदान, निधी उपलब्ध होताच वितरीत करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड पंचायत समिती (ता.जि.बीड) मध्ये मनरेगाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४४) ४४२७ (१५-०७-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड पंचायत समिती (ता.जि.बीड) मध्ये मनरेगा योजनेत रुपये १६ ते १७ कोटींची बोगस कामे ऑनलाईन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गैरव्यवहारात सहभागी असलेल्या मुख्य सूत्रधारांवर कारवाई न करता केवळ कंत्राटी कर्मचारी यांच्यावर कारवाई केली गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कारवाईचे सत्र हे गुन्हा दाखल केलेल्या आरोपीच्या भोवतीच ठेवले जात आहे, परंतू यातील मुख्य आरोपींना अभय दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुख्य आरोपींना अटक करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०२-०९-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पंचायत समिती, बीड अंतर्गत रुपये १४.८० कोटीची बोगस देयके ऑनलाईन करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) यासंदर्भात शिवाजी नगर पोलीस स्टेशन, बीड येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांमार्फत पुढील तपास चालू आहे.

---

## मौजे रायते (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील सामाईक मिळकतीवर मूळ वारसदारांच्या नावांची नोंद घेण्याबाबत

**(४५) ४४३६ (१५-०७-२०२०). श्री.निलय नाईक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रायते (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील स.नं. ४७/७, ५७/६, ८१/३, ९०/२ व ९०/१० या मिळकतीबाबतचा फेरफार क्रमांक १८२, दिनांक १५/१२/१९४० अन्वये सामाईक खातेदार देवकी चिंध्या महार यांच्या मुलीचा मुलगा जानू मुकुंद महार यांचे नाव वारस रजिस्टर प्रमाणे नोंद आहे, तथापि, फेरफार क्रमांक १८६९, दिनांक ५/११/२०१४ नुसार फक्त स.नं. ५७/६ या मिळकतीवर जानू मुकुंद महार यांची वारस नोंद झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारसदार या नात्याने स.नं. ४७/७, ५७/६, ८१/३, ९०/२ व ९०/१० या सर्व मिळकतीवर जानू मुकुंद महार यांचे नावाची नोंद होणे आवश्यक असताना जानू मुकुंद महार यांचेशी कोणताही व्यवहार न करता बेकायदेशीररित्या फेरफार क्रमांक १८२, दिनांक १५/१२/१९४० मध्ये जानू मुकुंद महार यांच्या नावावर कोणत्याही कारणाशिवाय रेषा मारुन त्यांचे नाव गैरप्रकारे फेरफार मधून काढून त्यांना जमिनीच्या मिळकतीमधून बेदखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान तसेच बाधितांनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री यांचेकडे दिनांक २१ जून, २०१८ रोजी निवेदन/पत्रव्यवहार करुन न्याय देण्याबाबत मागणी केली आहे, तसेच तहसिलदार, कल्याण यांचेकडे जावक पत्र क्र.८१, दिनांक २८ डिसेंबर, २०१८ रोजी वारसनोंद घेण्याबाबत अर्जाव्दारे मागणी करुनही उपरोक्त पत्रांना शासनाकडून कोणतेही उत्तर देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मौजे रायते येथील सामाईक मिळकतीवर मूळ वारसदारांच्या नावांची नोंद घेण्याच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करुन वारसनोंद घेण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (११-०९-२०२०) :** (१) व (२) मौजे रायते, ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं. ४७/७, ५७/६, ८१/३, ९०/२ व ९०/१० या मिळकतीबाबतचा फेरफार क्रमांक १८२, दिनांक १५/१२/१९४० चे अवलोकन करता, सामाईक खातेदार देवकी चिंध्या महार, कातोड्या राघ्या व मारुती चाह्या महार यापैकी देवकी चिंध्या महार मयत झाल्याने वारस रजिस्टर प्रमाणे भाऊबंद भिका शिवा महार यांचे नाव दाखल करणेकामी तालुका हुकूम नंबर आरटीएस एम ३७९ झालेवरुन नोंद केली असल्याचे दिसून येते. तसेच, नातू (मुलीचा मुलगा) जानु मुकुंद महार यांचे नावावर रेघ असल्याचे दिसून येते.

मौजे रायते येथील फेरफार क्रमांक १८६९, दिनांक ०५/११/२०१४ अन्वये स.नं. ५७/६ या मिळकतीचे खातेदार जानु मुकुंद जाधव हे मयत झाल्याने त्यास वारस म्हणून १) भागाबाई जानु जाधव - पत्नी, २) कांताबाई रामचंद्र - मुलगी, ३) यशवंत जानु जाधव - मुलगा व ४) मुकुंद जानु जाधव - मुलगा यांची नावे दाखल झाल्याचे दिसून येते.

(३) व (४) अशा आशयाची तक्रार शासनाकडे प्राप्त झाली होती.

तसेच, अर्जदार श्री.यशवंत जानु जाधव यांनी मौजे रायते येथील स.नं. ४७/७, ५७/६, ८१/३, ९०/२ व ९०/१० या जमीन मिळकतीवर फेरफार क्रमांक १८२, दिनांक १५/१२/१९४० अन्वये सामाईक मिळकतीवर मूळ वारसदारांची नोंद करण्याबाबत तहसिलदार, कल्याण यांच्याकडे विनंती केली होती. सदर प्रकरणी सामाईक मिळकतीवर जानु मुकुंद जाधव यांच्या वारसांचे नावे दाखल करणेकामी सर्वप्रथम सदर फेरफार पुनर्विलोकनात घेणेकामी सक्षम न्यायालयात दाद मागवी, असे कळवून तहसिलदार, कल्याण यांनी अर्जदार यांचा अर्ज निकाली काढला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गेवराई (जि.बीड) तालुक्यात अवैध वाळू उपसा व वाहतूक रोखण्याबाबत

**(४६) ४४६० (१५-०७-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनास रोखण्याकरीता गेलेल्या तहसिलदाराच्या गाडीला अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परने धडक देऊन जीवे मारण्याचा प्रयत्न केला असल्याची घटना माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध वाळू उपसा व वाहतूक रोखण्यासंदर्भात महसूल व पोलीस प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (३१-०७-२०२०) :** (१) व (२) दिनांक १२/६/२०२० रोजी वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करत असताना तहसिलदार, गेवराई यांचे वाहनास धडक दिल्याप्रकरणी वाहनचालक व धारक यांच्याविरुध्द गेवराई पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२७१/२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेवराई तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी उपविभागीय, तहसिलदार व नायब तहसिलदार स्तरावर पथके निर्माण करण्यात आली आहेत. तसेच तालुकास्तरीय दक्षता समिती व ग्राम दक्षता समिती स्थापन करण्यात आल्या आहेत.

गेवराई तालुक्यात सन २०१९-२०२० या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतुकीच्या ५० प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ९७,०७,१४०/- इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे. तर माहे एप्रिल, २०२० ते दिनांक १५ जुलै, २०२० या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतुकीच्या ३ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ८,९९,४०६/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच ७ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर १ प्रकरणी एमपीडीए अंतर्गत कार्यवाही केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी व ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४७) ४४९१ (१७-०७-२०२०). श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी व ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या वाटपामध्ये २०१० ते २०१६ यादरम्यान सुमारे २१०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे सिध्द झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी नेमलेल्या तीन आयपीएस अधिकाऱ्यांच्या समितीने सदर निष्कर्ष काढला असून आदिवासी विभागातील १५ टक्के आणि ओबीसी समाजकल्याण विभागातील १३% संस्था या गैरव्यवहारामध्ये सामील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (३०-०७-२०२०) :** (१) व (२) विशेष चौकशी पथकाने स्थानिक निधी लेखा परीक्षकांमार्फत केलेल्या चौकशीत राज्यातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच आदिवासी विकास विभागांतर्गत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती वाटपात सन २०१० ते २०१६ या कालावधीत आदिवासी विकास विभागांतर्गत १५.११ टक्के व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत १३.४३ टक्के संस्थेचे लेखापरीक्षण केले असून त्यामध्ये एकूण रुपये २१७४.३७ कोटी रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याचा निष्कर्ष अहवालात नमूद केला आहे. मात्र, सदर बाब अद्यापपावेतो सिध्द झालेली नाही.

(३) आदिवासी विकास विभागांतर्गत २९ प्रकल्प कार्यालये ही ४ अपर आयुक्त आदिवासी विकास कार्यालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत. विशेष चौकशी पथकाच्या अहवालाच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २२/९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार सविस्तर पडताळणी करुन वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ) विशेष चौकशी पथकाने अंतिम अहवालात दर्शविलेली रक्कम रुपये १८८.४५ कोटी.

ब) विशेष चौकशी पथकाच्या प्रकल्पनिहाय अहवालातील वसुलपात्र रक्कम रुपये १७०.०६ कोटी.

क) एकूण कार्यवाही केलेली रक्कम रुपये १४९.३५ कोटी.

ड) शिल्लक राहीलेली वसुलपात्र रक्कम रुपये २०.७० कोटी.

वसुलीची रक्कम रुपये २०.७० कोटी शासनास जमा केलेली नाही अशा १३ संस्था/महाविद्यालयांवर गुन्हे दाखल केले असून ६ संस्थांची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत गुन्हे दाखल करण्याबाबत शिफारस केलेल्या ६८ संस्थांपैकी ४ संस्था विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. उर्वरीत ५३ प्रकरणे न्यायप्रविष्ट असून ११ प्रकरणात गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता दिसून आली नाही.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत दर्शविलेल्या रुपये १८७५.७८ कोटी रकमेपैकी रुपये १७०५.३९ कोटी इतकी रक्कम आक्षेपित नसल्याचे आढळून आले आहे. उर्वरित रुपये १७०.४० कोटी इतकी रक्कम आक्षेपित/वसूलपात्र असून लेखापरीक्षणातील आकडेवारीच्या अनुषंगाने पडताळणी अनुपालन अहवाल गृह विभागास पाठविण्याची कार्यवाही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील सातार्डामध्ये तलाठ्याची नेमणूक करण्याबाबत

**(४८) ४६११ (१५-०७-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील सातार्डा या तलाठी सजामध्ये साटेली, सातोसे, कवटणी ही महसूली गावे समाविष्ट असून या सजामधील अत्यावश्यक सेवा, शेती हंगामातील फळ लागवड, कृषी संबंधित योजना, शासकीय योजना, ७/१२ (सातबारा), ८ अ, तसेच इतर महसूल विषयक कामे, ऑनलाईन सातबारा दुरुस्ती, खातेबदल, आणेवारी, उत्पन्न दाखला, नुकसान झालेल्या ठिकाणची पंचयादी अशी कामे तलाठी नसल्याकारणाने ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी यांची गैरसोय होत असून त्यांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातार्डा या तलाठी सजामध्ये तलाठी नेमणूक करावी म्हणून तेथील ग्रामस्थांनी दिनांक १ जुलै, २०२० रोजी तसेच यापूर्वी मा.महसूल मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, प्रांताधिकारी, सावंतवाडी, तहसिलदार, सावंतवाडी यांचेकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सातार्डा तलाठी सजामध्ये तलाठ्याची नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (३१-०७-२०२०)** : (१) नाही. सदर सजाचा अतिरिक्त कार्यभार लगतच्या सजातील तलाठी यांच्याकडे देण्यात आला होता.

(२) होय, ग्रामपंचायत, सातार्डा आणि ग्रामपंचायत, सातोसे यांनी तहसिलदार कार्यालय सावंतवाडी यांचेकडे दिनांक २९/०६/२०२० रोजी तसेच उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांचेकडे दिनांक ३०/०६/२०२० रोजी कायमस्वरुपी तलाठी नेमणुकीबाबत निवेदन दिलेले आहे.

(३) सजा सातार्डा (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे नियमित तलाठ्याची नियुक्ती करण्यात आली असून दिनांक ०९/०७/२०२० पासून सदर तलाठी संबंधित सजावर हजर झाले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___

## पालघर जिल्ह्यातील कासा परिसरात तसेच राष्ट्रीय महामार्गालगत आदिवासींच्या जमिनीवर अतिक्रमण झाल्याबाबत

**(४९) ४६२१ (३१-०७-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील कासा परिसरात तसेच राष्ट्रीय महामार्गालगत अनेक आदिवासी बांधवांच्या जागांवर अतिक्रमण व बांधकाम झाल्याचे दिनांक १ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या जागांवरील अतिक्रमण दूर करुन जागेचा ताबा आदिवासी बांधवांना मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१८-०८-२०२०) :** (१) व (२) श्रीमती काशी गणपत गोवारी व इतर या आदिवासी खातेदार यांचे मालकीचे मौजे कासा, ता.डहाणू, जि.पालघर येथील स.नं.४९ मध्ये श्री.हरेश शिवराम मुकणे यांनी अनधिकृतपणे कुंपणाचे बांधकाम केले असल्याबाबत दिनांक २४/०६/२०२० च्या पत्रान्वये तहसिलदार, डहाणू यांचेकडे तक्रार दाखल केली आहे. प्रस्तुत प्रकरणी मा.दिवाणी न्यायालय, डहाणू येथे कब्जा व निरंतर मनाई आदेशाच्या अनुषंगाने रे.मु.नं.३०/२०१८ दाखल असून कोर्ट कमिशन नेमून दिनांक ०३/०८/२०२० रोजी उप अधीक्षक, भूमी अभिलेख, डहाणू यांचेमार्फत जमिनीची मोजणी करण्यात आली आहे. सदर मोजणीचा अहवाल मा.दिवाणी न्यायालयात सादर करण्यात येणार आहे. मा.दिवाणी न्यायालय, डहाणू यांचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साखर कारखाने व सूत गिरण्यांच्या कर्जाला विनाअट शासन हमी देण्याचा निर्णयात बदल केल्याबाबत

**(५०) ४६५२ (१७-०७-२०२०). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारावर हुकमत ठेवण्यासाठी पूर्वी शासन हमीवर कर्ज उभारण्याची मुभा शासनाने कारखान्यांना दिली होती, मात्र याचा गैरफायदा घेत अनेक कारखान्यांनी शासनाच्या हमीवर घेतलेल्या कर्जाची परतफेडच केली नाही, त्यामुळे राज्य सहकारी बँकेने मा.सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर ६३ साखर कारखान्यांना दिलेल्या कर्ज हमीपोटी राज्य बँकेला रूपये ६९७ कोटी शासनाला द्यावे लागले असून राज्य बँकेप्रमाणे मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँक आणि नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक या बँकानी शासन हमीवर कारखान्यांना दिलेल्या ३४६ कोटी रूपयांच्या थकीत कर्ज वसूलीसाठी भुर्दंडही शासनाच्या माथी पडण्याची शक्यता आहे तसेच काही सूत गिरण्यांनाही शासनाची अशीच फसवणूक केल्यानंतर कोणत्याही सहकारी संस्थेस कर्जासाठी शासन हमी न देण्याचा निर्णय शासनाने तीन महिन्यांपूर्वी घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विनाअट कोणत्याही कारखान्यास थकहमी न देण्याबाबत निर्णय तीनच महिन्यातच बदलण्यात आला असून त्यामुळे त्यानंतर राज्यातील सुमारे ५० हून अधिक काराखान्यांनीही विनाअट कर्जहमीसाठी शासनाला विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तीन महिन्यांपूर्वी शासनाने घेतलेला निर्णय बदलण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सहकारी संस्थेस कर्जासाठी शासन हमी न देण्याच्या निर्णय बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२४-०८-२०२०) :** (१) कोणत्याही सहकारी संस्थेस कर्जासाठी शासन हमी न देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य शासनाने ६३ साखर कारखान्यांना दिलेल्या कर्ज हमीपोटी आतापर्यंत रुपये ५५० कोटी इतकी रक्कम राज्य सहकारी बँकेस अदा करण्यात आली आहे. मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँक आणि नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक यांनी शासन हमीवर कारखान्यांना दिलेल्या कर्जाची परतफेड न झाल्याने शासनाविरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

(२) सन २०२०-२०२१ च्या साखरेच्या गळीत हंगामाकरीता अल्पमुदत कर्जास शासन थकहमी मिळण्याकरीता साखर कारखान्यांचे प्रस्ताव क्षेत्रियस्तरावरुन पाठविण्यात आले आहेत. त्याची छाननी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) विभागाच्या दिनांक ०२/०३/२०२० च्या शासन निर्णयान्वये सहकारी साखर कारखान्यांना राज्य शासनामार्फत हमी देण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये सद्य:स्थितीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेंद्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आले आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.